SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

CCTV CAMERA बिघडला आहे का?
फक्त एकच कॉल ISO 9001 : 2015 Certified
Mandar Mulay
Cell : 98222 94622 | 94220 87757
www.mandarmulay.com

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. ०१.०७.२०२६ | अंक नं. ०७८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल... सर्वात स्वस्त देणारे फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी — खरेदीवर पॉइंट — पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चांदीमधील चैन, ब्रासलेट, अंगठी, पेंडन्टच्या 3000 पेक्षाही अधिक डिझाईन्स
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
सोन्याच्या दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ ९९९/-*

एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर नगरमध्ये कारवाई सुरु

परिवहन कार्यालयाकडून वाहनांची तपासणी

नगर – एप्रिल २०१९ पूर्वीच्या वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्याची मुदत ३० जून रोजी संपली असून, १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट वाहनांवर कारवाई सुरु झाली आहे. परिवहन मंडळाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यासाठी येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून शहरात वाहनांची तपासणी सुरु करण्यात आली असून, एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांना २ हजार रुपयांचा दंड आकारण्यात येत आहे.

राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी (हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट) नंबर प्लेट शासनाने सक्तीची केली आहे. ही नंबर प्लेट बसविण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर १ जुलैपासून दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार १ जुलै रोजी शहरातील मुख्य चांदणी चौक परिसरात आरटीओ कार्यालयाचे अधिकाऱ्यांनी थेट रस्त्यावर उतरून कारवाईला सुरु केली. येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी रुपाली खडसे, प्रणिता मुनफन, प्राजक्ता खोमणे, महेश भोजने, लक्ष्मण थोरात तसेच वाहन चालक दीपक खैरनार, छबुराव भिसे आणि राजाराम राठोड यांनी या मोहिमेत सहभाग घेतला. यावेळी शासकीय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या, तसेच अद्यापही जुन्या किंवा फॅन्सी नंबर प्लेट वापरणाऱ्या शेकडो वाहनांची तपासणी करण्यात आली आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

शहरातील चांदणी चौक येथे आरटीओकडून वाहनांची तपासणी करुन एचएसआरपी नंबर प्लेट नसणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात आली.

परिवहन विभागाच्या आदेशानुसार ही मोहीम यापुढेही अशीच सुरु राहणार आहे. ज्या वाहनधारकांनी अद्याप आपल्या वाहनांवर हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवलेली नाही, त्यांनी कायदेशीर कारवाई आणि दंड टाळण्यासाठी ही नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन आरटीओ प्रशासनाने केले आहे.

एचएसआरपी नंबरप्लेट बसविणारे सेंटर

परिवहन विभागाने एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी तीन कंपन्या नियुक्त केल्या आहेत. या तीन कंपन्यांकडून विविध फिटमेंट सेंटर ऑथराईज्ड करण्यात आले आहेत. सावेडीतील मकासरे हेल्थ क्लब शेजारी एसपी एन्टरप्रायजेस, नगर-पुणे रोडवर ओम गार्डनच्या विरुद्ध बाजुला असलेले फिटमेंट सेंटर, छत्रपती संभाजीनगर मार्गावर सिटी लॉनजवळील फिटमेंट सेंटर, जुन्या आरटीओ कार्यालयाजवळील लकी एन्टरप्रायजेस, सावेडी नाका येथील फिटमेंट सेंटर याशिवाय प्रत्येक वाहन शोरुमला एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याचे सेंटर सुरु करण्यात आले आहे, अशी माहिती आरटीओ कार्यालयाकडून सांगण्यात आली.

विधानपरिषदेच्या उपसभापतीपदी सचिन अहिर बिनविरोध

मुंबई – महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती पदासाठी १ जुलैला झालेल्या निवडणुकीत शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार आ. सचिन अहिर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांनी शेवटच्या क्षणी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने सचिन अहिर यांच्या निवडीचा मार्ग सुकर झाला आणि सभागृहाने आवाजी मतदानाने या निवडीवर शिक्कामोर्तब केले.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विधानपरिषदेतील सर्वपक्षीय आमदार उपस्थित होते. विधानपरिषदेतील पक्षीय बलाबल पाहता महायुतीसाठी ही निवडणूक सोपी होती. ठाकरे गटाचे ज्येष्ठ आमदार अनिल परब यांनी सभागृहात महाविकास आघाडीचे उमेदवार जगन्नाथ अभ्यंकर यांचा उमेदवारीचा प्रस्ताव मागे घेतल्याची घोषणा केली. या घोषणेनंतर संपूर्ण सभागृहाने बाके वाजवून या निर्णयाचे स्वागत केले. त्यानंतर सभापती प्रा. राम शिंदे यांनी सचिन अहिर यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली.

5 BHK बंगला विकणे आहे
भिस्तबाग चौक भागात फर्निचर सह मजबूत बांधकाम असलेले घर विकणे
तेजस कोठारी यांचे
नमीत प्रॉपर्टीज (नगर – पुणे – मुंबई – दुबई)
8421953963

गोडाऊन व कापड दुकानात कामगार पाहिजेत
सेल्समन : ३ जागा
हेल्पर : ३ जागा
पाईपलाईन रोड सावेडी, अहिल्यानगर
9075500840

१ जुलै
किरणभाऊ दाभाडे (सर)
आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
हॅलो : 8999283998
शुभेच्छुक हॅलो ग्रुप
अहिल्यानगर । पुणे । नाशिक
नातेवाईक ग्रुप, पुणे

मान्सून । महासेल ।। महासेल ।।।
महासेल...लूट लो ऑफर..
खास ग्राहकांच्या आग्रहास्तव सर्वांसाठी पुन्हा एकदा महासेल..
शुक्रवार दि. १० जुलै.२०२६ ते रविवार दि. १२ जुलै २०२६
* महिलांसाठी :- 2 XL पर्यंत टु पिस, वन पिस, नाईट ड्रेस, कॉड सेट, वर्क केलेले ब्लाऊज, फॉरमल पॅन्ट, ट्राऊजर, टॉप, कुर्ती, जीन्स, बिग साईज टी-शर्ट, ट्रॅक पॅण्ट, युनिक कुर्ती. यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-
* पुरुषांसाठी :- शर्ट, टी-शर्ट, जीन्स, नाईट पॅण्ट, ट्रॅक पॅण्ट. यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-
लहान मुलां-मुलींसाठी, जीन्स, टी-शर्ट, शर्ट, टॉप फ्रॉक, तसेच तोडबॅग, वॉटरप्रुफ बॅग, हॅण्ड बॅग, स्कूल सॅक. यापैकी काहिही घ्या. फक्त ₹200/-
3 XL ते 6 XL पर्यंत टु पिस रु.300/-, साडी रु.100/- पासून, ब्लाऊज स्ट्रेचेबल २ चे रु.100/-
लहान मुलांचे गॉगल रु.५०/-, मोठ्यांचे गॉगल रु.१००/-, रु.२९९ चा डिओ फक्त रु.९९/- तसेच हेअर ॲक्सेससरीज फक्त रु.१० पासून
वेळ : दु.१२ ते सायं.७ पर्यंत.. मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

कोटी कोटी वंदना..!
मौन साधक पू.गु. प्रार्थना पट्टु मुनिश्री जयवर्धनजी म.सा. 'पीयूष' के जीवन यात्रा के ६९ वर्ष पुरे होनेपर मन:पूर्वक कोटी कोटी वंदना ! और आगे की यात्रा को शुभकामना !
संदीप लोढा व परिवार
केवल अगरबत्ती तापीदास गल्ली, अ.नगर.
प.पू.श्री. जयवर्धनजी म.सा. 'पीयूष'

पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे
(आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : २६ जून ते २ जुलै २०२६
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
घबाड-कुंड 1.00 PM 150/-
कॉकटेल २ 3.35 PM 150/-
देऊळ बंद 6.30 PM 150/-
वेलकम टू दि जंगल हिंदी 09.00 AM 100/- 12.00 Noon 150/- 3.00 PM 150/- 6.00 PM 150/- 09.00 PM 150/-
आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 26 जून ते 2 जुलै 2026
वेलकम टू दि जंगल (हिंदी) 09:00 AM 10:15 AM 03:05 PM 05:10 PM 07:00 PM 09:15 PM 12:10 PM 06:10 PM 10:15 AM
कॉकटेल-२ 09:30 AM 12:30 PM 06:45 PM 09:45 PM
सुपरगर्ल (हिंदी) 10:00 PM 03:10 PM 08:10 PM
मै वापस आऊंगा (हिंदी) 12:00 PM 10:05 PM
1:30 PM
3:20 PM
4:30 PM
For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher* - Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

नालेगावात भांडण सोडवण्यास गेलेल्या व्यक्तीवर फरशीने हल्ला

नगर -शहरातील नालेगाव परिसरातील टांगेगल्ली येथे आपल्या मित्राचे सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या एका व्यक्तीवर आरोपींनी रागाच्या भरात फरशीच्या तुकड्याने हल्ला करून गंभीर जखमी केले. या प्रकरणी तिघांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत योगेश रोहीदास दातरंगे (वय ३४, रा. नालेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी रुख्मिणी ऊर्फ चांदणी रायक्कार, अशोक रायक्कार आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. २९ जूनला रात्री साडेआठ वाजेच्या सुमारास टांगेगल्ली परिसरात फिर्यादी यांचे मित्र संदीप शिर्के आणि आरोपी यांच्यामध्ये वाद सुरू होता. हा वाद मिटवण्यासाठी फिर्यादी योगेश दातरंगे तेथे गेले असता, आरोपी महिला रुख्मिणी हिने योगेश यांच्या कपाळावर फरशीचा तुकडा मारून त्यांना रक्तबंबाळ केले. तसेच दुसऱ्या मित्राच्या हाताच्या बोटाचा दाताने चावा घेतला. त्यानंतर आरोपी अशोक रायक्कार आणि त्याच्या साथीदाराने फिर्यादी व त्यांच्या मित्राला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. याच दरम्यान तेथे उपस्थित असलेल्या एका महिलेलाही आरोपींनी शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. या मारहाणीत जखमी झालेल्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे. कोतवाली पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस अंमलदार प्रदीप बडे करत आहेत.

विजेचा लपंडाव व कमी-जास्त व्होल्टेजमुळे उपकरणांचे नुकसान; आठ दिवसांत पुरवठा सुरळीत न केल्यास उपकेंद्राला टाळे ठोकणार

नगर - सावेडी उपनगरातील सावेडी, बालिकाश्रम रोड, सुडके मळा, बोरुडे मळा, धर्माधिकारी मळा, भुतकरवाडी, भिंगारदिवे मळा आणि शिंदे मळा या परिसरात गेल्या पंधरा दिवसांपासून विजेचा अक्षरशः लपंडाव सुरू असून वारंवार होणाऱ्या वीज खंडितमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सतत कमी-जास्त होणाऱ्या विद्युत प्रवाहामुळे घरातील टीव्ही, फ्रीज, पंखे, पाण्याच्या मोटारी तसेच इतर महागडी विद्युत उपकरणे जळत असून नागरिकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

वारंवार होणाऱ्या वीजपुरवठा खंडितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दैनंदिन कामकाज, विद्यार्थ्यांचा अभ्यास, नोकरदारांचे ऑनलाइन काम तसेच व्यावसायिकांचे व्यवहार यावरही याचा विपरीत परिणाम होत असून नागरिकांना मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

सावेडी उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीचे निवेदन महावितरणला निवेदन देण्यात आले. (छाया - लहू दळवी)

या प्रश्नाची दखल घेत माजी महापौर बाबासाहेब वाकळे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महावितरण प्रशासनाला कडक इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, येत्या आठ दिवसांत सावेडी उपनगरातील वीजपुरवठा सुरळीत करण्यात आला नाही, वारंवार होणारे ट्रिपिंग आणि कमी-जास्त व्होल्टेजचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला गेला नाही, तर सावेडी येथील महावितरणच्या वीज उपकेंद्राला टाळे ठोकून तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की, महावितरणने नागरिकांना अखंडित आणि दर्जेदार वीजपुरवठा करणे ही त्यांची मूलभूत जबाबदारी आहे. वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे नागरिकांच्या घरातील लाखो रुपयांची विद्युत उपकरणे खराब होत आहेत. या नुकसानीची जबाबदारी महावितरण प्रशासनाने स्वीकारून तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात.

सावेडी उपनगरातील नागरिकांनीही वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करत प्रशासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अन्यथा जनआंदोलन उभारण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

विषारी औषध प्राशन केलेल्या वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू

नगर - फकीरवाडा परिसरातील रहिवासी असलेल्या ७२ वर्षीय वृद्धाने विषारी औषध प्राशन केल्यामुळे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना ३० जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. कचरू लक्ष्मण शिंदे असे मृत वृद्धाचे नाव आहे.

शिंदे यांनी २८ जून मुकुंदनगर येथील लक्ष्मी माता मंदिराजवळ विषारी औषध घेतले होते. त्यानंतर त्यांना त्यांचे नातेवाईकांनी अत्यंत गंभीर अवस्थेत तातडीने उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. मात्र, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच ३० जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. सिव्हील हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन शिंदे यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले आणि याबाबत पोलिसांना कळवले. या प्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, महिला पो.हे.कॉ. मरभळ तपास करत आहेत.

घरकुलाच्या अनुदानाचा हप्ता मंजुरीसाठी मागितली २० हजारांची लाच

ग्रामविकास अधिकारी, लिपिकासह, पंचायत समितीच्या अभियंत्यावर गुन्हा

नगर - प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलाच्या बांधकाम अनुदानाचा पुढील हप्ता मंजूर करण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ३० जून रोजी सापळा रचून राहुरी तालुक्यातील सात्रळ ग्रामपंचायत येथील कंत्राटी लिपिक, ग्रामविकास अधिकारी तसेच पंचायत समितीतील कंत्राटी गृहनिर्माण अभियंता या तिघा लोकसेवकांवर कारवाई केली. या तिघांच्या विरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सापळ्यात अडकलेल्या आरोपींमध्ये ग्रामपंचायत सात्रळ (ता. राहुरी) येथील ग्रामविकास अधिकारी हैदर याकुब पटेल (वय ५६ रा. राहुरी फॅक्टरी), याच ग्रामपंचायतीतील कंत्राटी लिपिक ज्ञानदेव मोहन डुकरे (वय ४३ रा. सात्रळ) आणि पंचायत समिती राहुरी येथील कंत्राटी गृहनिर्माण अभियंता सचिन हौशीराम ब्राम्हणे (रा. लोणी, ता. राहाता) यांचा समावेश आहे. तक्रारदार यांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुलासाठी अर्ज केला होता आणि सन २०२३ मध्ये त्यांचे घरकुल मंजूर झाले होते. बांधकामासाठी अनुदानाचा पहिला हप्ता १५ हजार रुपये व दुसरा हप्ता ७० हजार रुपये त्यांना यापूर्वीच प्राप्त झाला होता.

मात्र बांधकामासाठीचा पुढील अनुदान हप्ता मंजूर करण्याच्या प्रक्रियेत मदत करण्याच्या मोबदल्यात लिपिक डुकरे यांनी, पटेल व ब्राम्हणे यांच्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार २९ जून रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांच्याकडे प्राप्त झाली होती. तक्रारीच्या पडताळणीदरम्यान ३० जुन रोजी तक्रारदार यांनी आरोपी पटेल व डुकरे यांची भेट घेतली असता, अनुदान मंजुरीच्या प्रक्रियेत मदतीच्या मोबदल्यात २० हजार रुपयांची मागणी निश्चित झाल्याचे स्पष्ट झाले. यानंतर आयोजित सापळा कारवाईत आरोपी डुकरे यांनी तक्रारदाराकडून प्रत्यक्ष लाचेची रक्कम स्वीकारली, तर आरोपी ब्राम्हणे यांनी ही रक्कम स्वीकारण्यास डुकरे यांना प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. या तिघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही सापळा कारवाई पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सविता तांबे, पोलीस निरीक्षक राजू आल्हाट, तसेच पोलीस कर्मचारी चंद्रकांत भीमसेन, किशोर कुळधरण, शेखर वाघ व चालक दशरथ लाड यांच्या पथकाने केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक छाया देवरे करत आहेत.

तोफखान्यातील जुगार अड्ड्यावर छापा

नगर - शहरातील तोफखाना परिसरात असलेल्या ठाकूर गल्लीत तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना तिघांना तोफखाना पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. त्यांच्या कडून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे. ३० जून रोजी रात्री ९ च्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. तोफखाना पोलीस ठाण्यातील गुन्हे शोध पथक प्रमुख उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना ठाकूर गल्ली येथे काही इसम जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार उपनिरीक्षक चाहेर, पोलीस अंमलदार दिनेश मोरे, भानुदास खेडकर, सतिश शिंदे, सुमित गवळी, सुजय हिवाळे यांच्या पथकाने रात्री ९ च्या सुमारस तेथे छापा टाकला. त्यावेळी राजेंद्र रामनारायण राठोड (रा. ठाकूर गल्ली, तोफखाना), राहुल पोपट अहिरे (रा. भूषणनगर, केडगाव), सागर शंकर कुऱ्हे (रा. बोल्हेगाव) हे तिघे तिरट नावाचा पत्त्यांचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत त्यांच्या कडून १२८० रुपये रोख व जुगाराचे साहित्य जप्त केले. त्या तिघांच्या विरुद्ध तोफखाना पोलीस ठाण्यात पो.हे.कॉ. दिनेश मोरे यांच्या फिर्यादी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रानडुकराच्या हल्ल्यात महिलेचा दुर्दैवी मृत्यू

नगर - नगर तालुक्यातील देऊळगाव सिद्धी येथील वृद्ध महिलेचा रानडुकराने चावा घेतल्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कांताबाई जगन्नाथ कदम (वय ६६, रा. देऊळगाव सिद्धी, ता. नगर) असे या मृत महिलेचे नाव आहे. ३० जून रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास गुंडेगाव रोड येथील बेंदाडवस्ती परिसरात हा प्रकार घडला.

कांताबाई कदम

मयत कांताबाई व त्यांचा नातू हे दुपारी बेंदाडवस्ती परिसरात आपल्या शेतात काम करत होते. तेव्हड्यात त्या ठिकाणी एक रानडुक्कर पळत आले. त्याने अगोदर रस्त्याने सायकलवर चाललेल्या एका व्यक्तीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र तो थोडक्यात बचावला. त्यानंतर त्या रान डुकराने कांताबाई शेतात काम करणाऱ्या कांताबाई यांच्या नातवावर हल्ल्याचा प्रयत्न केला. मात्र त्याच्या हातात खोरे होते. त्याने त्या खोऱ्याच्या सहाय्याने त्याला हुसकावले. त्यानंतर झाडांच्या आळ्यातील गवत काढत असलेल्या कांताबाई यांना रानडुकराने धडक देत खाली पाडले.त्यानंतर त्यांच्यावर हल्ला चढवला आणि चावा घेत त्यांच्या पायाचे व इतर शरीराचे लचके तोडले. त्यामुळे त्या गंभीररीत्या जखमी झाल्या. त्यांना त्यांचा मुलगा बापू जगन्नाथ कदम यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये नेले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच वाटेतच त्यांचा मृत्यू झाला होता. तेथील मेडिकल ऑफिसर डॉ. काळे यांनी तपासून त्यांना उपचारापूर्वीच मृत घोषित केले.

या संदर्भातील अहवालावरून नगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.या घटनेची माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. हल्ला करणारे हे रानडुक्कर पिसाळलेले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे देऊळगाव सिद्धी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मयत कांताबाई यांच्यावर रात्री देऊळगाव सिद्धी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, २ मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र तातडीने हलविण्यात यावे : नगरसेवकांची मागणी

महापौर ज्योतीताई गाडे यांची प्रत्यक्ष पाहणी; स्वच्छता, औषध फवारणी आणि पर्यायी जागेच्या पाहणीबाबत प्रशासनाला तातडीच्या सूचना

नगर - मनपा प्रभाग क्रमांक ७ मधील प्रोफेसर कॉलनी चौक येथे असलेले महापालिकेचे कचरा संकलन केंद्र तातडीने अन्यत्र हलविण्यात यावे, अशी मागणी प्रभागातील नगरसेवकांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. या मागणीची दखल घेत महापौरांनी प्रत्यक्ष कचरा संकलन केंद्राची पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्राची पाहणी करून प्रशासनाला तातडीच्या उपाययोजना करण्याच्या सूचना देताना महापौर ज्योतीताई गाडे. (छाया - लहू दळवी)

प्रोफेसर कॉलनी चौक येथील या कचरा संकलन केंद्रावर सावेडी उपनगरातील विविध भागांतील कचरा घंटागाड्यांद्वारे एकत्रित आणला जातो. त्यानंतर येथून कॉम्पॅक्टरच्या माध्यमातून तो बुरुडगाव कचरा डेपो येथे पाठविला जातो. मात्र या केंद्रामुळे परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरत असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः पावसाळ्यात कचऱ्यातील घाण रस्त्यावर येत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

या परिसरात दत्त देवस्थान, छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा तसेच रात्री भरणारी चौपाटी असल्याने दररोज मोठ्या संख्येने नागरिक या भागात ये-जा करतात. त्यामुळे या प्रमुख ठिकाणी असलेले कचरा संकलन केंद्र तातडीने अन्यत्र हलविण्याची मागणी प्रभाग क्रमांक ७ मधील नगरसेवक मनोज दुल्लम, सतीश शिंदे, करण कराळे आणि पुष्कर कुलकर्णी यांनी महापौर ज्योतीताई गाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यानंतर महापौर ज्योतीताई गाडे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली आणि प्रशासनाला तातडीने आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, या कचरा संकलन केंद्रासाठी पर्यायी जागेची तातडीने पाहणी करून केंद्र स्थलांतरित करण्याबाबत कार्यवाही करावी. प्रोफेसर कॉलनी चौक हा शहरातील प्रमुख आणि अत्यंत वर्दळीचा भाग असल्याने येथे स्वच्छता राखणे अत्यंत आवश्यक आहे. परिसरात नियमित साफसफाईसह वेळोवेळी औषध फवारणी करण्यात यावी, जेणेकरून दुर्गंधी पसरू नये आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणार नाही, असे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले.

यावेळी नगरसेवक सतीश शिंदे म्हणाले की, प्रोफेसर कॉलनी चौक येथील कचरा संकलन केंद्र हटविण्याचा प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल. या केंद्रामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असून वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करूनही कोणताही ठोस निर्णय घेतला जात नाही.

महापौर ज्योतीताई गाडे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या असून प्रशासनाने त्याची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी त्यांनी केली.

लेखक भास्कर देशमुख यांचे निधन

नगर - ज्येष्ठ साहित्यिक, निवृत्त प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी तथा विपुल लेखन करणारे लेखक भास्कर पर्वतराव देशमुख (वय ७९) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अहिल्यानगर येथील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. शासकीय सेवेत त्यांनी मराठवाडा विभागाचे प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी म्हणून सुमारे २० वर्षे उल्लेखनीय सेवा बजावली.

सन १९६३ ते १९८४ या कालावधीत विविध साप्ताहिके व मासिकांमध्ये त्यांनी लघुकथा आणि लेख लिहिले. १९८४ मध्ये जनसेवा प्रकाशन, मुंबई यांनी प्रकाशित केलेली 'प्राइस' ही त्यांची पहिली मराठी कादंबरी वाचकांच्या पसंतीस उतरली. त्यानंतर २००२ पासून त्यांनी कादंबरी, बालसाहित्य आणि विविध साहित्य प्रकारांमध्ये विपुल लेखन केले. भास्कर देशमुख यांनी आपल्या साहित्य कारकीर्दीत तब्बल १७० पुस्तकांचे लेखन केले. त्यापैकी मनोरमा प्रकाशन, अक्षरवेध प्रकाशन, सुपर्ण प्रकाशन आणि ललित प्रकाशन यांसारख्या प्रकाशन संस्थांनी १६० पुस्तके प्रकाशित केली. चित्रपट क्षेत्रातही त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. लेखक राम केळकर आणि प्रफुल्ल पारेख यांच्यासोबत पटकथा व संवाद लेखन केले. तसेच 'झिप्री' आणि 'कंट्रोल झेड' या चित्रपटांसाठी कथा, पटकथा, संवाद आणि गीतलेखन केले. विविध विषयांवरील अनेक लघुपटांचे लेखनही त्यांनी केले होते.

गळफास घेऊन आत्महत्या

नगर - नगर तालुक्यातील सारोळा बद्धी येथील मन्सूर रहेमान बेग (वय ७०) यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ३० जून रोजी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे.

मन्सूर बेग यांनी अज्ञात कारणातून आपल्या राहत्या घरी गळफास घेतला होता. हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांचे नातेवाईक इसाक रहेमान बेग यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगर येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. सिव्हिल हॉस्पिटलचे मेडिकल ऑफिसर डॉ. काळे यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. या बाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलीस स्टेशनमध्ये आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.महिला पो.हे.कॉ.मोहिनी कर्डक पुढील तपास करत आहेत.

जिल्हा बँकेकडून १ लाख ९२ हजार २८२ पात्र शेतकरी खात्यांचा तपशील पोर्टलवर अपलोड

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना

नगर - राज्य शासनाने शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांचा आत्म विश्वास वाढविणे तसेच शेती क्षेत्राला नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कृषी कर्जमुक्ती योजना' जाहीर केली आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने जिल्ह्यातील १ लाख ९२ हजार २८२ पात्र शेतकरी खातेदारांचा तपशील शासनाच्या पोर्टलवर अपलोड केला आहे. सहकार विभागाच्या जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या वतीने योजनेची पारदर्शक आणि वेळेत अंमलबजावणी होऊन पात्र शेतकऱ्यांना तातडीने लाभ मिळावा, यासाठी बँकेला खातेदारांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, २८ जून अखेर बँकेने ९९.८४ टक्के पात्र कर्जदार खातेदारांची माहिती पोर्टलवर अपलोड केली असून, ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे.

तालुकानिहाय अपलोड करण्यात आलेल्या पात्र खात्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे : अकोले - १० हजार ४७८, जामखेड - ९ हजार ६३१, कर्जत - १२ हजार ३०५, कोपरगाव - ३ हजार ९५९, नगर - ९ हजार ४२५, नेवासा - २६ हजार ९९, पारनेर - ९ हजार ४८८, पाथर्डी - ८ हजार ९२०, राहुरी - १६ हजार ३४७, राहता - ६ हजार ७१८, शेवगाव - १५ हजार ७४८, संगमनेर - ११ हजार ८६, श्रीगोंदा - ४१ हजार ३८३ आणि श्रीरामपूर - १० हजार ६९५.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पात्र शेतकऱ्यांचा तपशील पोर्टलवर अपलोड करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यात येत असून, उर्वरित खात्यांची माहितीही लवकरच अपलोड करण्यात येणार आहे.

गावठी दारू अड्ड्यावर कारवाई

नगर - बोल्हेगाव परिसरामध्ये चालू असलेल्या गावठी दारू अड्ड्यावर तोफखाना पोलिसांच्या पथकाने अचानकपणे छापेमारी केली. या धडक कारवाईत पोलिसांनी दारू अड्डा पूर्णपणे उद्ध्वस्त करत एकाला ताब्यात घेतले आहे.

बोल्हेगाव परिसरात गावठी दारू अड्ड्याचे शेड उद्ध्वस्त करताना पोलीस.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तोफखाना पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रमिला गायकवाड, पोलीस कर्मचारी दिनेश मोरे आणि हेमंत झिने हे कर्तव्यावर असताना त्यांना गोपनीय माहिती मिळाली. बोल्हेगाव येथील गांधीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर, बाभळीच्या झाडाच्या आडोशाला एक इसम बेकायदेशीरपणे गावठी हातभट्टीच्या दारूची विक्री करत असल्याचे त्यांना सांगण्यात आले.

या माहितीची गांभीर्याने दखल घेत, पोलीस पथकाने छापा टाकून राम भाऊ खलाटे (वय ४२, रा. मोरया पार्क, बोल्हेगाव, अहिल्यानगर) याला पकडले. त्याच्याकडे दोन ड्रममध्ये भरलेली एकूण ५० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू आढळून आली. या जप्त केलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ५ हजार रुपये आहे.

याबाबत महिला पो. हे. कॉ. प्रमिला गायकवाड यांच्या तक्रारीवरून आरोपी राम भाऊ खलाटे याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गृहिणी

आरोग्य

ताक पिण्याचे लाभ

ताक हे आपल्या स्वयंपाकघरातलं साधं पण गुणकारी पेय आहे. प्राचीन काळापासून याला 'पाचकांचं राजा' मानले जाते आणि आता आधुनिक आहारशास्त्रानेही याला 'प्रोबायोटिक ड्रिंक'चा दर्जा दिला आहे. ताक कॅल्शियम, व्हिटॅमिन बी १२, पोटॅशियम आणि चांगल्या बॅक्टेरियांनी समृद्ध आहे. यातील खास 'लॅक्टिक सिड' पचनक्रिया सुधारते, पोटातील उष्णता कमी करते आणि अन्न चांगलं पचण्यास मदत करते. रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी ताक रामबाण आहे कारण एक ग्लास ताकातून चांगले बॅक्टेरिया मिळून पोटाचे आरोग्य जवळपास पूर्ण होते. वजन कमी करू इच्छिणाऱ्यांसाठी हे पेय उत्तम आहे, कारण यात फॅट कमी आणि प्रोटीन जास्त असते. कॅल्शियममुळे हाडे मजबूत होतात तर प्रोबायोटिक्स बद्धकोष्ठ व सिडिटीसारख्या आजारांपासून बचाव करतात. उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी, उष्णतेचा त्रास कमी करण्यासाठी आणि त्वचा तजेलदार ठेवण्यासाठीही ताकाचा उपयोग होतो. आयुर्वेदात ताकाला त्रिदोषशामक व भूक वाढवणारे पेय मानले आहे. जिरे-मीठ-मिरपूड टाकून ते चविष्ट बनते. महागड्या विदेशी प्रोबायोटिक ड्रिंक्सपेक्षा ताक सहज, स्वस्त आणि आपल्या मातीतले असल्याने अधिक गुणकारी ठरते.

पाककला

चॉकलेट मॅगी पुडिंग

साहित्य : मॅगी नूडल्स १ पाकीट, दूध ५०० मिली, साखर ४ चमचे, कोको पावडर २ चमचे, कॉर्नफ्लोअर १ चमचा, व्हॅनिला इसेन्स १/२ चमचा, बटर १ चमचा, चॉकलेट चिप्स २ चमचे, ड्राय फ्रूट्स सजावटीसाठी

कृती: मॅगी नूडल्स गरम पाण्यात २ मिनिटे उकडून घ्या. मसाला वापरायचा नाही. नूडल्स गाळून थंड पाण्याने धुवा म्हणजे चिकट होणार नाहीत. एका जाड बुडाच्या पॅनमध्ये दूध गरम करायला ठेवा. दूध कोमट झाल्यावर त्यात साखर, कोको पावडर आणि कॉर्नफ्लोअर मिक्स करून गुठळ्या मोडून घ्या. मंद आचेवर ढवळत राहा. मिश्रण घट्ट होऊ लागल्यावर त्यात उकडलेले नूडल्स, बटर आणि व्हॅनिला इसेन्स घाला. ३-४ मिनिटे शिजवा. नूडल्स पुडिंगमध्ये मस्त मिक्स होतील. गॅस बंद करून चॉकलेट चिप्स घाला. गरम असतानाच छोट्या वाट्यांमध्ये काढा. फ्रिजमध्ये २ तास सेट करायला ठेवा. वरून ड्राय फ्रूट्स आणि थोडे चॉकलेट चिप्स घालून थंड सर्व्ह करा.

वास्तू

पाण्याची टाकी

* टाकी बाहेरून गडद निळी, आकाशी किंवा पांढरी असावी. काळी, लाल किंवा मरून रंगाची टाकी टाळा.
* आकार गोल, चौकोनी किंवा आयताकृती चालेल. ओबडधोबड आकाराची किंवा तुटलेली टाकी १००% वास्तुदोष निर्माण करते.

सौंदर्य

झोपण्यापूर्वी उशीवर एक स्वच्छ सुती रुमाल टाका आणि रोज बदला. उशीच्या अभ्रामुळे पिंपल्स येतात.

सल्ला

शिजवलेला भात उरला तर त्यावर तुपाचा हात फिरवून ठेवा, दुसऱ्या दिवशी मोकळा होतो.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २ जुलै २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, निज ज्येष्ठ कृष्णपक्ष, उ.षा. ०९।२८, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.

राशिभविष्य

मेष : लोकांमध्ये मतभेद आणि अनोळखी लोकांचा विरोध आपणास अस्वस्थ करू शकते.

वृषभ : वेळेकडे लक्ष ठेवा. कार्यात अत्यंत व्यस्त राहाल. खर्च वाढेल. कार्यक्षेत्रात मानसिक ताण होण्याची शक्यता आहे. बेपवाई, बेशिस्त, योजनेच्या कार्यवाहीत खोळंबा निर्माण करू शकते.

मिथुन : मनातल्या इच्छा पूर्ण होतील. उत्साहजनक बातम्या मिळतील. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. तसे आपले सार्वजनिक जीवन बहुमूल्य राहील.

कर्क : कौटुंबिक वातावरण आनंद आणेल. आर्थिक विषयांमध्ये आपल्या प्रयत्नांमुळे आपणास यश मिळेल. हितचिंतकांकडून व्यापारासंबंधी चांगला सल्ला मिळू शकतो.

सिंह : करियरबद्दल आपण हट्ट धरू शकता. कठोर परिश्रम केल्यानंतर यश मिळेल. व्यापार-व्यवसायात सावधगिरी बाळगा.

कन्या : महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही. उत्साहवर्धक बातमी मिळाल्याने आनंद होईल.

तूळ : आपल्या कुटुंबात बऱ्याच काळापासून चालणारा एखादा वादाचा विषय आपणास अस्वस्थ करेल.

वृश्चिक : काही गोष्टी आपल्या जीवनात आकस्मिकरीत्या आनंद आणतील. आपल्या नवीन आवडींना प्रोत्साहन द्या आणि जीवनात आलेल्या या परिवर्तनाचा आनंद घ्या.

धनु : आजचा दिवस आपणास पैसे मिळवण्याच्या आणि व्यापाराच्या नव्या संधी देईल परंतु घाई करणे अडचणीत टाकू शकते. आज रात्री विश्रांती घ्या.

मकर : आज आपला जोडीदार किंवा प्रिय व्यक्ती त्याच्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्यावर दबाव आणू शकतो.

कुंभ : मानसन्मानाच्या क्षेत्रात वाढ होईल. कामात एखाद्याचे सहकार्य प्रगतीचे कारण बनेल. आर्थिक विषयांमध्ये थोड्या अडचणी येऊ शकतात.

मीन : यथायोग्य विचार करून कार्य करा. मानसन्मानात वाढ होईल. महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल.

शब्दगंध क्र. ७४६४ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) फलंदाज असलेला एक निवृत्त भारतीय क्रिकेटपटू जो भारतीय जनता पक्षाचा खासदारही होता ७) बूड; खालचा भाग ८) ताजेपणा; टवटवी १०) चहा पिण्याच्या भांड्यांची जोडी १३) फळातील रसाळ भाग; गर १४) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र १६) सर्कशीतील विविध प्रकारच्या हालचाली २०) एकरूप; तादात्म्य २३) भारतातील एक सर्वात मोठा राजकीय पक्ष २४) मद; कैफ; नशा २५) निषध देशाचे राजाराणी (महाभारत फेम)

उभे शब्द :- १) हाराणा प्रतापाच्या घोड्याचे नाव २) सत्यानाश; निर्वंश ४) कर; हस्त ५) मऊ; मृदू; मवाळ ६) गणितातील एक प्रकार ९) टिकाव ११) बसण्यासाठीचे छोटे वस्त्र; आसन १२) नाडी; नस; धमनी; रक्तवाहिनी १५) समान नसणे; विषम १७) सभेचा मुख्य १८) तीन गुणांपैकी एक; धूळ १९) बारीकसारीक घटनांची नोंद असलेला मजकूर २१) एका दिवसात आक्रमिलेला रस्ता; टप्पा २२) मुस्लीम पुरुषाचे एक नाव

शब्दगंध क्र. ७४६३ चे उत्तर

स	चि	न	तें	डु	ल	क	र
क	रा	र	■	ल	व	ल	व
वा	■	मा	ल	की	ण	■	र
र	ज	ई	■	■	■	पा	व
■	ल	■	पा	ठो	पा	ठ	■
प	त	दा	र	■	वा	क	स
सा	रं	ग	ध	र	■	■	म
रा	म	■	■	थ	र	थ	र

* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : आनंद हा वस्तूंमध्ये नसतो, तो आपल्या विचारांमध्ये असतो.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

आपल्याला गुडगुल्या फक्त काहीच ठिकाणी का होतात?

लहान मुलांना गुडगुल्या केल्या की ते खळखळून हसतात आणि अंग चोरतात. पण गंमत अशी की गुडगुल्या सगळीकडे होत नाहीत. काखेत, मानेवर, पोटावर, पायाच्या तळव्यावर जास्त होतात, पण कोपरावर, गुडघ्यावर, पाठीवर अजिबात होत नाहीत. असे का? सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शरीराचे 'संरक्षण कवच'. जिथे महत्त्वाचे अवयव, मोठ्या रक्तवाहिन्या किंवा नसा असतात, तिथे मेंदूने जास्त 'नर्व्ह एंडिंग्ज' म्हणजे संवेदनशील तारा बसवल्या आहेत. मान, काख, पोट, बरगड्या या भागात शत्रूने हल्ला केला तर लगेच कळावे म्हणून हे 'अलार्म सेन्सर' असतात. तिथे कोणी हात लावला की मेंदूला 'धोका आहे' असा सिग्नल जातो आणि आपण प्रतिक्षिप्त क्रियेने हसतो, अंग चोरतो. म्हणूनच तळपायाला जास्त गुडगुल्या होतात - काटा, काच टोचू नये म्हणून निसर्गाने तिथे जास्त सेन्सर दिले आहेत. दुसरे कारण म्हणजे मेंदूचा गोंधळ. गुडगुल्या करताना मेंदूतील 'हायपोथॅलमस' आणि 'सेरेबेलम' हे दोन भाग एकत्र काम करतात. हायपोथॅलमसला वाटतं 'धोका आहे, पळा', पण सेरेबेलमला माहीत असतं 'मित्रच खेळतोय, मजा आहे'.

या दोन भावनांच्या गोंधळामुळे आपण घाबरून पण हसतो. पाठ, कोपर, नडगी येथे नर्व्ह एंडिंग्ज कमी आणि हाड जास्त, म्हणून मेंदूला धोका वाटत नाही आणि गुडगुल्या होत नाहीत. शास्त्रज्ञ गुडगुल्यांचे दोन प्रकार मानतात. पहिला 'निस्मेसिस' - पिसाने किंवा कापसाने हलकेच स्पर्श केला की होणारी खाज. दुसरा 'गार्गलिसीस' - जोरात गुडगुल्या केल्या की येणारे खळखळून हसणे. गार्गलिसीस फक्त ठराविक भागातच होतो कारण तिथेच 'धोका + आनंद' हा मेंदूचा गोंधळ होतो.स्वतःला गुडगुल्या का होत नाहीत? कारण सेरेबेलम आधीच ओळखतो की हा माझाच हात आहे. तुम्ही हालचाल करण्याआधीच मेंदू त्याची कॉपी बनवतो. त्यामुळे 'सरप्राईज' हा घटक नसतो. म्हणून दुसऱ्याने केले तरच गुडगुल्या होतात.

रोबोटने किंवा मशीनने केले तरी थोड्या होतात, कारण ते अनपेक्षित असते.उत्क्रांतीचा संबंध: लाखो वर्षांपूर्वी जंगलात राहताना लहान कीटक, साप, विंचू अंगावर चढले तर लगेच कळावे म्हणून हे सेन्सर विकसित झाले. काखेत किंवा मानेवर काही सरपटले की आपण लगेच झटकतो. तीच यंत्रणा आज गुडगुल्या म्हणून काम करते. लहान मुलांना मोठ्यांपेक्षा जास्त गुडगुल्या होतात कारण त्यांची संरक्षण यंत्रणा जास्त सतर्क असते.सगळ्यांना सारख्या होत नाहीत: काही लोकांची नर्व्ह सिस्टम जास्त सेन्सिटिव्ह असते, त्यांना खूप गुडगुल्या होतात. काहींची कमी असते. चिंता, भीती किंवा रागात असताना गुडगुल्या कमी होतात कारण मेंदू तेव्हा 'धोका' मोडमध्ये असतो. प्राण्यांनाही गुडगुल्या होतात. उंदीर, माकड, कुत्री यांनाही गुडगुल्या केल्या की तेही हसल्यासारखे आवाज काढतात.

थोडक्यात, गुडगुल्या होणारी ठिकाणे म्हणजे शरीराचे 'अलार्म बटण' आहेत. जिथे धोका जास्त, तिथे अलार्म जास्त. म्हणूनच मानेवर, पोटावर, तळपायावर गुडगुल्या होतात, पण कोपरावर नाही. पुढच्या वेळी मित्राला गुडगुल्या कराल तेव्हा लक्षात ठेवा - तुम्ही त्याच्या शरीरातील संरक्षण यंत्रणा तपासताय!

खरी किंमत

एका गावात रामू आणि श्यामू नावाचे दोन शेजारी राहत होते. दोघांच्याही अंगणात मोठे वृक्ष होते. रामूच्या अंगणात पिंपळ होता आणि श्यामूच्या अंगणात आंब्याचे झाड होते. रामू रोज पिंपळाच्या पानांकडे बघून चिडायचा. तो म्हणायचा, या पिंपळाला काय फायदा? ना फळ, ना फूल. फक्त कचरा करणारी पाने. त्यापेक्षा श्यामूचा आंबा बघ, किती गोड फळे देतो. श्यामू मात्र शांतपणे हसायचा. तो रोज सकाळी पिंपळाला पाणी घालायचा. सुरुवातीला रामूने त्याच्या पिंपळाच्या फांद्या तोडून टाकल्या कारण पाने खूप गळायची. त्याला वाटायचे की फक्त आंबा, चिकू, पेरू अशी फळझाडेच महत्त्वाची. श्यामू मात्र पिंपळाची निगा राखायचा. तो म्हणायचा, प्रत्येक झाडाचा काही ना काही उपयोग असतोच. रामू त्याला वेड्यात काढायचा.

सहा महिन्यांत रामूने पिंपळ पूर्ण छाटून टाकला, फक्त खोड ठेवले. श्यामूचा पिंपळ मात्र डेरेदार झाला. मग एक दिवस गावात मोठा दुष्काळ पडला. विहिरी आटल्या, हवा प्रचंड गरम झाली. रामूचे आंब्याचे झाडही सुकून गेले कारण त्याला खूप पाणी लागायचे. प्राण्यांना, पक्ष्यांना सावली मिळेना. लोकं उष्माघाताने आजारी पडू लागली. रामूच्या घरात तर बसवतच नव्हते, पत्र्याचे घर तापून भट्टीसारखे झाले होते. श्यामूचे अंगण मात्र गार होते कारण पिंपळाची दाट सावली होती. पिंपळाची मुळे खोलवर जातात, त्यामुळे तो कमी पाण्यातही हिरवागार राहतो. त्याच वेळी गावातल्या म्हाताऱ्या आजीला धाप लागली. डॉक्टर म्हणाले, हिला शुद्ध हवा हवी, ऑक्सिजन कमी पडतोय. रामू हताशपणे म्हणाला की मी आंब्याची १०० पेटी विकली, पण आता शुद्ध हवा कुठून आणू? श्यामू मात्र क्षणाचाही विचार न करता आजीला त्याच्या पिंपळाखाली झोपवले. पिंपळाचे पान रात्रंदिवस ऑक्सिजन सोडते, हे त्याला माहीत होते. थोड्याच वेळात आजीचा श्वास मोकळा झाला. गावकरी कौतुकाने टाळ्या वाजवू लागले. रामूची मान शरमेने खाली गेली. दुष्काळ संपल्यावर तो श्यामूकडे गेला आणि म्हणाला की तुझा पिंपळ खरा आहे मित्रा. श्यामू फक्त हसला आणि म्हणाला फळझाड वाईट नाही, पण फक्त फळ बघून झाडाची किंमत ठरवू नकोस. कारण संकटाच्या दिवशी आंबा खाता येत नाही, तेव्हा कामाला येतो तो शुद्ध श्वास देणारा पिंपळ. हे ऐकून रामूने ठरवले की आता तो अंगणात पुन्हा पिंपळ लावेल आणि त्याच्या मुलांनाही सांगेल. कारण त्याला कळले होते की दिसण्यात, खाण्यात उपयोगी नसलेल्या गोष्टीही वेळेला प्राण वाचवतात.फक्त गोड फळ देणारेच वृक्ष महत्त्वाचे नाहीत. खरी किंमत तीच जी संकटाच्या वेळी स्वतःला आणि दुसऱ्याला जगवू शकते. पिंपळाचे पान कचरा नाही, ते निसर्गाचे ऑक्सिजनचे फॅक्टरी आहे.

तात्पर्य : ज्या गोष्टींना आपण 'कचरा' समजून फेकून देतो, त्याच गोष्टी कधीकधी आपला श्वास बनून जगवतात. म्हणून कोणत्याही गोष्टीला कमी लेखू नये.

आत्मशक्ति

आत्म्याचे बलीदान

मृत्यूदूत इजराईल त्यांच्यावरून भ्रमण करील. ते अत्यंत अरुंद गल्लीत फसतील जेथून त्यांची सुटका नाही. नानक म्हणतात की, शेवटी सत्य राहील आणि खोटे नष्ट होईल. जपुजी साहेबामध्ये गुरु नानक देवजींनी वरील दिव्य मंडळाचे वर्णन केले आहे. शीख धर्माचे लोक मानतात की, त्यांच्या गुरुंच्यामार्फत शिकवलेले पाच नामजीवन मृत्युच्या कालचक्रातून मुक्त करु शकतात आणि आत्मा, परमात्मा ह्यांचा संयोग घडवू शकतात. सूफी लोक आत्मा अमर आहे असे मानतात आणि प्रभुच्या नामाचा जप अथवा सुमिरन त्यांच्या आत्म्याला मुक्त करून. परमेश्वराशी एकरूप करतो अशी त्यांची धारणा आहे. मौलाना रूमीसाहेब आंतरीक यात्रेबाबत म्हणतात,

मी एक धातु बनलो व नंतर मृत्यु पावलो, नंतर एक रोपटे (वनस्पती बनलो) त्या रोपट्याच्या मृत्युनंतर जनावर बनलो. जनावर म्हणून नष्ट झाल्यावर मी आतां मनुष्य बनलो आहे. मग मी मृत्युला का भ्यावे ? मृत्यु पावतांना माझ्यात काय कमीपणा आला? आणि पुनः एकदा मी मरेन, आणि देवदूत म्हणून जन्माला येईन. परंतु, देवदूतांच्याही पुढे मला जन्म घ्यावा लागेल! परमेश्वराशिवाय बाकी सारे नष्ट होईल. जेव्हां मी माझ्या आत्म्याचे बलिदान करीन व मग असा काही बनेल ज्याचा कोणी विचारही करू शकणार नाही ! अहाहा ! अहो, मला निर्जीव होण्यासाठी जीवंत ठेवू नका! मी घोषणा करतो की, मी परमेश्वरापर्यंत पुन्हा परत जाईल. मृत्यूदूत इजराईल त्यांच्यावरून भ्रमण करील. ते अत्यंत अरुंद गल्लीत फसतील जेथून त्यांची सुटका नाही. नानक म्हणतात की, शेवटी सत्य राहील आणि खोटे नष्ट होईल. जपुजी साहेबामध्ये गुरु नानक देवजींनी वरील दिव्य मंडळाचे वर्णन केले आहे. शीख धर्माचे लोक की, त्यांच्या गुरुंच्यामार्फत मानतात.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

दुसऱ्याला मदत करा

सुरेश ओबेरॉय :

ज्याप्रमाणे लोक म्हणतात, 'येन-केन प्रकारेण' म्हणजे जसं होईल तसं काम करणं.

शिवानीदीदी :

हो, आपण टिकून राहण्यालाच आपल्या यशाचा आणि समाधानाचा पाया बनवलं. आपल्याला वाटतं, आपण जितकं जास्त मिळवू तितकेच यशस्वी होऊ, तितकेच समाधानी होऊ. आपल्यापैकी कित्येकांनी आयुष्यात खूप काही मिळवलं आहे. पण तरी त्यांना आतून रिक्त, पोकळ वाटतं. आपल्याला हवं असलेलं प्रेम आणि समाधान आपण अनुभवूच शकत नाही. याचं कारण आपला मूळ स्वभाव देण्याचा आहे आणि आपण याच्या विरुद्ध जात आहोत.

सुरेश ओबेरॉय देणं हा आपला मूळ स्वभाव आहे हे तुम्ही सिद्ध करू शकता का? शिवानीदीदी दुसऱ्या व्यक्तीला मदत करा आणि हे करताना तुम्हाला कसं वाटतं ते बघा.

सुरेश ओबेरॉय : असं केल्याने नक्कीच खूप चांगलं वाटतं.

शिवानीदीदी :

पण तुम्हाला एवढं चांगलं का वाटतं? कारण आपल्या जीवनाचा मूळ हेतूच, आपल्याकडे जे काही आहे ते इतरांना देण्याचा आहे. सुरेश ओबेरॉय आपल्या मूळ स्वभावाकडे परत जाणं हाच आपल्या जीवनाचा उद्देश आहे का?

शिवानीदीदी :

आपला मूळ स्वभाव 'देण्याचा'च आहे. आपण सतत देत राहणाऱ्या देवाचे वंशज आहोत असं आपण म्हणतो. त्यांना नेहमीच काही ना काही देताना दाखवलं जातं. लक्ष्मीदेवी भौतिकरीत्या संपत्ती देते किंवा आशीर्वादाच्या रूपात सगळं काही दिलं जातं.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

गण्या : तुझी बायको तुझ्यावर दिवसभर ओरडत असते, तरी तू शांत कसा राहतोस?

पप्पू : अरे सोपं आहे... वाघासमोर कधी कुत्र्याला भुंकताना पाहिलंय का?

गण्या : नाही रे बाबा, कधीच नाही!

पप्पू : बस... मी मनात स्वतःला वाघ समजतो आणि तिलाही तेच वाटू देतो!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा कोणता आहे?

- अहमदनगर

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आहारवेद - आरोग्य संवर्धन

बटाटा

औषधी गुणधर्म : आयुर्वेदानुसार बटाटा हा वातवर्धक, अग्निप्रदीपक, बलकारक, शीत, मधुर, पचण्यास जड, वीर्यवर्धक व कफकारक आहे.

आधुनिक शाखानुसार कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'अ', 'क' व 'ब' जीवनसत्त्वे, पिष्टमय पदार्थ व उत्तम प्रथिनेही विपुल प्रमाणात आहेत. त्याचबरोबर अल्कलीयुक्त क्षार, पोटॅशिअम, आर्द्रता व तंतुमय पदार्थ यांचाही साठा भरपूर आहे. या सर्व गुणधर्मामुळे बटाटा हा शरीरास पोषक ठरतो.

उपयोग : २) बटाट्यातील औषधी गुणधर्मच्या पोषक घटकामुळे तो कमी पैशांत मिळणारा गरीब-श्रीमंतवर्गाचा आवडता आहारीय पदार्थ म्हणून नावाजलेला आहे. बटाटा हा अल्कलीयुक्त गुणांनी समृद्ध असल्यामुळे जेव्हा शरीराला अतिरिक्त आम्लाचा त्रास होत असेल, तर अशा वेळी आम्लाचे प्रमाण कमी करण्यासाठी बटाट्याचा उपयोग करावा. ३) जुनाट मलावरोध, आम्लपित्त या विकारांवर बटाटा उकडून त्याचे सूप करून प्यावे.

४) शरीरामध्ये युरिक ॲसिडचे प्रमाण वाढत असेल, तसेच मूतखडा होऊन मूत्रप्रवृत्तीला अडथळा निर्माण झाला असेल, तर अशा वेळी आहारात टोमॅटो, काकडी, पालक, बीटची पाने, कोथिंबीर व बटाटा या सर्व भाज्या एकत्र करून त्याचे सूप प्यावे. हे सूप नियमित काही दिवस घेतल्यास मूत्रप्रवृत्ती साफ होते. ५) सौंदर्यविकारांमध्येही बटाटा गुणकारी आहे. बटाट्यामध्ये पोटॅशिअम, फॉस्फरस, क्लोरिन, गंधक हे घटक असल्यामुळे त्याचा रस त्वचेवर लावल्यास काळवंडलेली त्वचा नितळ होते. फक्त हा प्रयोग करताना कच्च्या बटाट्याची पेस्ट किंवा रस वापरावा. बटाटा उकडल्यास वरील घटकद्रव्ये कमी होतात.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने वट पौर्णिमेच्या दिवशी एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करून वटपौर्णिमा साजरी करण्यात आली.

एकल माता भगिनींच्या हस्ते वट पौर्णिमेला वटवृक्षारोपण

पुरोगामी विचार, स्त्री सन्मान आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश; कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनचा उपक्रम

नगर – कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने भारतीय संस्कृतीत विशेष परंपरा असलेल्या वट पौर्णिमेच्या दिवशी एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करून वटपौर्णिमा साजरी करण्यात आली. समाजातील वंचित, उपेक्षित आणि संघर्षमय जीवन जगणाऱ्या एकल माता भगिनींना सन्मानाचे स्थान देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

शहरातील वृंदावन कॉलनी, वर्धमान महावीर कॅम्पसजवळ, नगर–कल्याण रोड येथे संस्थेचे अध्यक्ष प्रशांत पाटील शेळके यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. भारतीय संस्कृतीत वटवृक्षाला दीर्घायुष्य, स्थैर्य, संरक्षण आणि जीवनदायी शक्तीचे प्रतीक मानले जाते. त्याच वटवृक्षाच्या साक्षीने समाजातील एकल माता भगिनींना सन्मानपूर्वक व्यासपीठ देऊन त्यांच्याप्रती आदर, संवेदना आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. या प्रसंगी मनपा स्थायी समितीचे माजी सभापती सुवर्णाताई जाधव, नगरसेविका वैशालीताई नळकांडे, आपला मावळा महिला प्रदेशाध्यक्षा प्रियंका पाटील शेळके – बोबडे, सामाजिक सेविका अश्विनी झरेकर, गायत्री बागडे, शारदा विधावे, रेणुका नाळके, आशा शेळके, माधुरी शेळके, मंदाकिनी पवार, साक्षी बागडे, तसेच नरेंद्र पवार, प्रणव पवार, युगांक दुशिंग व भारत धारवाले आदींसह एकल महिला उपस्थित होत्या.

या उपक्रमाचे हे सलग दुसरे वर्ष असून, मागील वर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमाला समाजातील विविध स्तरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. वटपौर्णिमा हा सण केवळ धार्मिक आणि पारंपरिक स्वरूपात साजरा न करता, त्यामध्ये सामाजिक समता, स्त्री सक्षमीकरण आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा समावेश करून पुरोगामी विचारांचा संदेश देण्याचा प्रयत्न कृष्णाली व कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनच्या माध्यमातून सातत्याने केला जात आहे.

समाजात अनेकदा एकल माता भगिनींना संघर्ष, उपेक्षा आणि सामाजिक दबावाला सामोरे जावे लागते. मात्र, त्यांना केवळ सहानुभूतीची नव्हे तर सन्मानाची गरज आहे, या विचारातून या उपक्रमाची संकल्पना साकारण्यात आली. एकल महिलांच्या संघर्षाला सलाम करत, त्यांच्या आत्मविश्वासाला बळ देण्याचा आणि समाजात त्यांचे योगदान अधोरेखित करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

प्रशांत पाटील शेळके म्हणाले की, वटपौर्णिमा हा सण केवळ परंपरा म्हणून साजरा करण्यापेक्षा त्याला सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीची जोड देणे आवश्यक आहे. समाजातील एकल माता भगिनींना सन्मान देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे. भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राज्यभर राबविण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित प्रत्येक एकल माता भगिनींच्या हस्ते वटवृक्षाचे रोपण करण्यात आले. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलनाच्या पार्श्वभूमीवर वृक्ष संवर्धनाची गरज अधोरेखित करत प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी योगदान देण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

समाजातील एकल माता भगिनींना सन्मानाने समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. स्त्री सन्मान, सामाजिक समता आणि पर्यावरणीय जबाबदारी यांचा संगम घडविणारा हा उपक्रम समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

प्रेरणादायी अक्षरधन

पाप लपत नाही

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स

डॉ. मधुकर आष्टीकर लिखीत नंदादीप प्राजक्त ९८९०९५६६९५

अगदी बारीक सारीक पाहतात फक्त माझ डोळे. बाकी जग आंधळे । मी तेवढा सज्जन, बाकी चोरच सगळे मांजरीने डोळे मिटले, तिला वाटले जग अंधारात बुडाले. लागली दूध प्यायला भांड्यातले. पाठीत बडगे बसले, मग डोळे उघडले. पण या प्रसंगातले मर्म माणसाला कुठे कळले? तो अजूनही आपले डोळे मिटून जगाला आंधळे समजण्यात दंग.

माणसाला वाटते आपण वाईट गोष्ट केली, पण ती कुणी नाही पाहिली. आपण तशी काळजीच घेतली. अंधारातच ती घडली. शिवाय संशय घ्यायला आपण जागाच नाही ठेवली. कशी बेमालूम घडवून आणली! पण ही फुशारकी व्यर्थच सगळी. सूर्य, चंद्र, वारा, अग्नी, आकाश आणि भूमी, काळ आणि पाणी, हे सगळेच हजर होते ना त्या क्षणी. शिवाय तुझे, तू समजतोस तसे शुद्ध, न्यायी हृदय होतेच ना साक्षी. हलता दिवस, ढळती संध्याकाळ, उगवती सकाळ आणि सर्वदूर पसरलेली रात्र पाहतच होती. पुन्हा सृष्टीचा न्याय, आणि धर्माचे भय संपले काय ?

नाही, माणसाला पाप करते समयी यातले काहीही आठवत नाही. पण पाप लपत नाही. मग आठवतात देव.

पापातून मुक्त होण्याच्या वाटा आपल्यासाठी ठरतात दुबळ्या. कशाचा घ्यावा आधार, न कळे काही उपाय. आपले कुकर्मच येते आडवे, पण त्याही क्षणी मोह न सोडवे. आता काय करावे म्हणजे या दुःखातून मुक्त होईन, ते कळत नाही. तसे दैववशात काही घडतही नाही.

मग माणूस घेतो कुतर्काचा आधार. म्हणतो, माझ्यावरचा आरोप निराधार पण त्याच्या बोलण्याला नसते धार. सगळ्या गोष्टी उधार. जमवतो खोटेना पुरावे, पण ते उपयोगी पडत नाहीत. म्हणून आधीच मनात सद्भाव ठेवावा सद्विचार व सत्कर्म यॉंविषयी विश्वास बाळगावा. दुसऱ्याचे वाईट करण्याचा डाव न टाकावा. स्वार्थासाठी दुसऱ्याला लुबाडण्याचा खेळ न खेळावा.

मनात आणि वागण्यात सदैव, वाईट वासनांचा अभाव, मग लागली परतीरी त्याची नाव

तुकाराम महाराज म्हणतात, की पाप करील आणि मुजोरी करून ते नाकारील, तर सर्वनाशच ओढवेल. पापालाही पाय असतात. ते न्यायाकडे चालत जातात. पाप्याला शिक्षेकडे ओढत नेतात.

जुनी गोष्ट. एकाने सावकाराकडून कर्ज घेतले. शाईने सही केली. शाई वाळावी म्हणून रेती किंवा पांढरी माती टाकायची त्यावेळी पद्धत होती. सावकाराने तो कागद घेऊन पैसे दिले. पुढे त्या चोराने पैसे घेतल्याचे साफ नाकारले. प्रकरण राजापुढे गेले. सावकाराने पैसे घेतल्याचा कागद राजाला दिला. राजा गोंधळला. त्यावर कर्ज घेणाराची सहीच नव्हती.

राजाचा न्यायाधीश चतुर होता. त्याने तो कागद सूर्याच्या प्रकाशात धरला. सही स्पष्ट दिसली. सहीच्या जागी एक मुंगी मेलेली होती. न्यायाधीशाने चटकन ताडले, सही मुंग्यांनी खाल्ली. ते खरे ठरले. कर्जदाराने शाई वाळायला पांढरी माती नव्हे, तर साखरेची पिठी टाकली होती. ती साखर मुंग्यांनी खाल्ली. त्याबरोबर सहीची शाई नाहीशी झाली. पण साखर व शाईबरोबर कागदाचे कणही मुग्यांनी कुरतडले व सहीची मूळ अक्षरे कोरून गेली. सूर्याच्या किरणात ती अक्षरे उमटली. कर्जदाराची लबाडी उघडकीला आली.

– किशोर गांधी

श्रीक्षेत्र मोहटादेवी देवस्थान मंदिर परिसरात वृक्षारोपणास प्रारंभ

श्री जगदंबा मोहटादेवी देवस्थान, मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते करण्यात आला.

नगर – श्री जगदंबा मोहटादेवी देवस्थान, मंदिर परिसरामध्ये वृक्षारोपण मोहिमेचा शुभारंभ देवस्थानचे अध्यक्ष तथा धर्मादाय उप आयुक्त नवनाथ जगताप व विश्वस्त मंडळ यांचे हस्ते करण्यात आला. श्री जगदंबा मोहटादेवी देवस्थान मंदिराचा परिसर अधिक देखणा आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी आता आधुनिक लँडस्केपिंग (भूरचना) तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. केवळ झाडे न लावता, संपूर्ण परिसराचा सुनियोजित विकास करून आकर्षक आणि नियोजनबद्ध वृक्षारोपण करण्यात येणार आहे. मंदिर परिसर आणि आजूबाजूच्या डोंगराळ भागात हजारो विविध वृक्षांची, फुलझाडांची, वेलींची लागवड करण्यात येणार आहे.

लँडस्केपिंग कायमस्वरूपी सुंदर राहण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धती वापरली जाणार आहे. पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी स्वयंचलित ठिबक सिंचन आणि तुषार सिंचन यंत्रणा उभारण्याचे नियोजीत आहे. यामुळे झाडांना गरजेनुसार नियमित पाणी मिळेल. या नियोजनबद्ध लँडस्केपिंगमुळे आगामी काळात मोहटादेवी गड केवळ धार्मिक केंद्र न राहता, एक उत्कृष्ट आणि मनमोहक निसर्ग पर्यटन स्थळ म्हणून नावारूपास येईल, असा विश्वास देवस्थान समितीने व्यक्त केला आहे.

यावेळी विश्वस्त तथा सहा.धर्मादाय आयुक्त विशाल शेंडे, ॲड. विक्रम वाडेकर, ॲड. प्रसन्न दराडे, ॲड. कल्याण बडे, शशिकांत दहिफळे, बाबासाहेब दहिफळे, अशोक दहिफळे, बाळासाहेब लाहोटी, शुभम दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भणगे, जनसंपर्क अधिकारी भिमराव खाडे, लेखापाल संदीप घुले, पुजारी भूषण साकरे तसेच कर्मचारी भाविक भक्त उपस्थित होते.

कथावाचक पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड'ने सन्मानित

मुंबई मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील गढा गावात असलेल्या 'बागेश्वर धाम'चे प्रमुख आणि कथावाचक पंडित धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांना 'इंटरनॅशनल आयकॉन अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले आहे. मुंबईत हा पुरस्कार 'विनर्स बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स'चे संस्थापक–अध्यक्ष आणि 'प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालया'चे ध्यान प्रशिक्षक १८४ वर्ल्ड रेकॉर्ड करणारे पहिले भारतीय ब्रह्माकुमार डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या प्रसंगी उद्योजक विजय आढाव उपस्थित होते.

'भारतरत्न लता मंगेशकर–संगीताची सरस्वती' व्याख्यानासह तेलुगू सांस्कृतिक महोत्सवाला प्रतिसाद

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य तेलुगू साहित्य अकादमीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'भारतरत्न लता मंगेशकर – संगीताची सरस्वती' या विशेष व्याख्यानासह तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमाला अहिल्यानगरकरांनी प्रतिसाद दिला. साहित्य, संगीत आणि संस्कृतीचा अनोखा मिलाफ अनुभवायला मिळालेल्या या कार्यक्रमात भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या अजरामर संगीत वारशाचा जागर करण्यात आला. व्याख्यानातून त्यांच्या जीवनातील अनेक अपरिचित पैलू उलगडले गेले, तर विविध पारंपरिक नृत्य सादरीकरणांनी उपस्थितांना भारतीय पारंपारिक शास्त्रीय संस्कृतीचे वैभव अनुभवण्याची संधी दिली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी तेलुगू साहित्य अकादमीचे समन्वयक अशोक कंटे, स्थानिक समन्वयिका सुरेखा कोडम व भिमराज कोडम, महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी हरीश इरनक तसेच 'भारतरत्न लता मंगेशकर – संगीताची सरस्वती' या पुस्तकाचे लेखक आणि व्याख्याते कस्तुरी मुरलीकृष्णा यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. दीपप्रज्वलनानंतर उपस्थितांचे स्वागत करण्यात आले आणि कार्यक्रमाची सुरुवात सांस्कृतिक वातावरणात झाली.

प्रमुख व्याख्याते कस्तुरी मुरलीकृष्णा यांनी आपल्या प्रभावी भाषणात लता मंगेशकर यांच्या जीवनप्रवासाचा अत्यंत हृदयस्पर्शी आढावा घेतला. ते म्हणाले, लतादीदी या साक्षात सरस्वतीचा अवतार होत्या. त्यांनी भारतातील जवळपास प्रत्येक राज्यातील भाषांमध्ये आपल्या सुमधुर आवाजातून गीते सादर करून भारतीय संगीताला जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख मिळवून दिली. त्यांच्या स्वरांनी लाखो–कोट्यवधी भारतीयांच्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या कर्तृत्वाची उंची इतकी महान आहे की, लतादीदींसारखे व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे अशक्य आहे.

यावेळी त्यांनी आपल्या 'भारतरत्न लता मंगेशकर – संगीताची सरस्वती' या पुस्तकातील अनेक संदर्भ उपस्थितांसमोर मांडले. लता मंगेशकर यांच्या बालपणापासून ते जागतिक कीर्तीच्या गायिका होण्यापर्यंतचा संघर्ष, त्यांची साधी राहणी, संगीतावरील निष्ठा, विविध भाषांमधील गायन, संगीतकार आणि गीतकारांशी असलेले संबंध, तसेच त्यांचा गाण्यातील ठहराव, त्यांच्या आयुष्यातील अनेक अज्ञात प्रसंग त्यांनी रसाळ शैलीत उलगडून सांगितले. त्यांच्या ओघवत्या तेलुगू विवेचनामुळे श्रोते अक्षरशः मंत्रमुग्ध झाले. व्याख्यान संपल्यानंतरही उपस्थितांनी त्यांना अनेक प्रश्न विचारत संवाद साधला.

कार्यक्रमाचे समन्वयक अशोक कंटे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, महाराष्ट्र राज्य तेलुगू साहित्य अकादमीच्या माध्यमातून तेलुगू भाषांतील साहित्य, संगीत आणि संस्कृती यांचा परिचय समाजाला करून देण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. अहिल्यानगरात झालेल्या या कार्यक्रमात तब्बल १०८ कलाकारांनी सहभाग नोंदविला. हिंदू संस्कृतीत १०८ या अंकाला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. योगायोगाने १०८ कलाकारांनी सहभाग घेतल्यामुळे हा कार्यक्रम महाराष्ट्रातील आगळावेगळा सांस्कृतिक विक्रम ठरला आहे. विविध परंपरांचा संगम घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाला मिळालेला प्रतिसाद भविष्यात अशाच मोठ्या उपक्रमांसाठी प्रेरणादायी ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली. अंजली नृत्यालयाच्या कलाकारांनी 'स्वागतकृष्णा', 'चंद्रचूड', 'प्रणवालय' आणि 'तांडव' ही भरतनाट्यम नृत्ये सादर करून भारतीय शास्त्रीय नृत्यकलेचे अप्रतिम दर्शन घडविले. या सर्व नृत्यांची संकल्पना व नृत्यदिग्दर्शन कु. प्रतिमा कोडम आणि कु. वैभवी म्याना यांनी केले होते. त्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली.

त्यानंतर श्री गुरुदत्त महिला मंडळाने पारंपरिक 'मंगळागौर' सादर करून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेचे दर्शन घडविले. एकदंत महिला मंडळाने तेलंगणातील प्रसिद्ध 'बतकम्मा' हा सांस्कृतिक सोहळा सादर केला. फुलांच्या सजावटीसह बतकम्मा तयार करण्यात आलेल्या या कार्यक्रमाने प्रेक्षकांची विशेष मने जिंकली. तसेच नित्य सेवा महिला मंडळ आणि मार्कंडेय ग्रुप यांनी संयुक्तपणे पारंपरिक 'कोलालु' सादर करून तेलुगू संस्कृतीचे वैशिष्ट्य प्रभावीपणे मांडले. विविध रंगांची वेशभूषा, संगीत आणि पारंपरिक सादरीकरणामुळे संपूर्ण सभागृह सांस्कृतिक उत्साहाने भारावून गेले.

या कार्यक्रमाला साहित्य, संगीत, कला आणि सांस्कृतिक क्षेत्रातील रसिकांसह तेलुगू समाजबांधव, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, महिला मंडळांच्या सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात भारतीय संस्कृतीतील विविधतेतून एकतेचा संदेश प्रभावीपणे देण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक समन्वयिका सुरेखा कोडम, भीमराज कोडम, ज्ञानेश्वर मंगलारम, अजय म्याना, दीपक गुंडू, श्रीनिवास एल्लारम, संजय चिप्पा यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन तेलगुमधून अशोक कंटे व मराठीमधून श्रीनिवास एल्लारम यांनी प्रभावीपणे केले. भीमराज कोडम यांनी आभार मानले.

'स्नेहबंध'तर्फे पोलीस अधीक्षक कार्यालय परिसरात वृक्षारोपण

पर्यावरण संवर्धनासाठी समाजाने पुढे यावे : पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन

नगर – पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने पोलीस अधीक्षक कार्यालय, परिसर (अहिल्यानगर) येथे वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

'स्नेहबंध'च्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, पोलीस उपअधीक्षक (शहर) डॉ. दिलीप टिपरसे, पोलीस उपअधीक्षक (ग्रामीण) शिरीष वमने, राखीव पोलीस निरीक्षक उमेश परदेशी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन म्हणाले, वृक्षारोपण हा केवळ एक दिवसाचा कार्यक्रम नसून तो पर्यावरण संवर्धनाचा सातत्यपूर्ण संकल्प आहे. प्रत्येकाने एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास हरित आणि प्रदूषणमुक्त समाज घडविण्यास मोठी मदत होईल. सामाजिक संस्थांनी अशा उपक्रमांतून जनजागृती करणे ही काळाची गरज आहे.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, पर्यावरणाचे रक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. स्नेहबंध फौंडेशनच्या माध्यमातून वृक्षारोपण, पर्यावरण जनजागृती व सामाजिक उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. भविष्यातही विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने अधिकाधिक वृक्षारोपण करून हरित अहिल्यानगरच्या संकल्पनेला बळ देण्याचा आमचा प्रयत्न राहील.

कार्यक्रमात उपस्थितांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

सावेडीतील कजबे वस्तीत वटपौर्णिमा उत्सव साजरा

सावेडी परिसरातील कजबे वस्तीत वटपौर्णिमेचा पवित्र सण उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील अनेक सुवासिनी एकत्र येत पारंपरिक वेशभूषेत सजून वडाच्या झाडाची विधीवत पूजा केली.

नगर – शहरातील सावेडी परिसरातील कजबे वस्तीत वटपौर्णिमेचा पवित्र सण उत्साहात साजरा करण्यात आला. परिसरातील अनेक सुवासिनी एकत्र येत पारंपरिक वेशभूषेत सजून वडाच्या झाडाची विधीवत पूजा केली.

महिलांनी पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य, कुटुंबाच्या सुख–समृद्धीसाठी तसेच अखंड सौभाग्यासाठी प्रार्थना केली. यावेळी सौ. शोभा दातीर, ज्योती वाव्हळ, सुनीत्ता ठोंबरे, वृषाली शिरसाठ, शैला बारगळ, मीरा बारस्कर, प्रांजली कुलकर्णी आणि जयश्री बारस्कर यांच्यासह परिसरातील महिलांनी सहभाग नोंदविला. महिलांनी वडाच्या झाडाला पवित्र धागे गुंडाळून पूजा–अर्चा केली, वटसावित्रीची कथा श्रवण केली तसेच पारंपरिक ओव्या आणि मंगलगीतांनी संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला.

महिलांनी पारंपरिक नऊवारी साड्या, आकर्षक दागिने आणि फुलांनी सजून भारतीय संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. सामूहिक पूजेमुळे महिलांमध्ये ऐक्य, स्नेह आणि परस्पर सहकार्याची भावना अधिक दृढ झाली. एकमेकींना वटपौर्णिमेच्या शुभेच्छा देत महिलांनी हा सण साजरा केला.

वटपौर्णिमा हा भारतीय संस्कृतीतील श्रद्धा, निष्ठा आणि कौटुंबिक मूल्यांचे प्रतीक मानला जाणारा सण आहे. आधुनिक जीवनशैलीतही या परंपरा जपल्या जात असल्याचे चित्र सावेडीतील कजबे वस्तीत पाहायला मिळाले. अशा सामूहिक धार्मिक उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य बळकट होत असून भारतीय संस्कृतीचे जतन करण्यासही मोठी मदत होत असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.

श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुकांसह रथयात्रेचे ३ जुलैला नगरमध्ये आगमन

श्री सत्यसाई सेवा संघटना स्वागतासाठी सज्ज : भक्तांमध्ये उत्साह, जय्यत तयारी पूर्ण

नगर – मानव, बंधुत्व आणि ईश्वरी पितृत्व या वैश्विक भावनेने सत्य, धर्म, शांती, प्रेम, एकता असे राष्ट्रहिताचे महत्वपूर्ण संदेश संपूर्ण भारतभर देत निघालेल्या श्री सत्यसाई प्रेमवाहिनी रथयात्रेचे आणि दिव्य पादुकांचे आगमन नगर जिल्ह्यात काष्टी येथे ३ जुलै ला होणार आहे. रथासोबत असलेल्या श्री सत्यसाईबाबांच्या दिव्य पादुका दर्शनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे, अशी माहिती श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हाप्रमुख अशोक कुरापाटी यांनी दिली.

ते म्हणाले, आपल्या जिल्ह्याच्यावतीने काष्टी येथे स्वागत सोहळा झाल्यावर ३ जुलैला सायंकाळी ५ वाजता कायनेटिक चौकापासून रथासोबत मोटारसायकल व सायकल रॅली निघेल. स्टेशन रोडवरील सक्कर चौकात रथयात्रेचे स्वागत होईल. सक्कर चौकापासून यात्रा सुरू होईल. यात्रेच्या अग्रभागी सनी चौघडा, तुतारी, बॅण्ड पथक, लेझीम पथक, बाल वारकरी रहातील. गुरू पालक, ज्येष्ठ नागरिक आणि श्री सत्य साई भक्त परिवार शोभायात्रेत सहभागी होईल. रथावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली जाईल. नवीन टिळक रोडवरील नंदनवन लॉन्समध्ये या यात्रेचे आगमन होईल. सायंकाळी ६ ते ९ या वेळेत रथामधील पादुकांचे विधीवत पूजन, वेदपठण आणि मंगल महाआरती होईल. सर्व धर्मांचे प्रमुख धर्मगुरू सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना करतील. त्यानंतर सांस्कृतिक महोत्सव पार पडेल.

४ जुलैला पहाटे नगर संकीर्तन, सकाळी ७ ते ८.३० पुरोहित ब्रम्हवृंदांचे वेद मंत्र पठण, साई भक्तांचे घरी श्री स्वामी पादुका पूजन, सकाळी ९ ते ११ या वेळेत श्री सत्य साई बाल विकास भजन महोत्सव पार पडेल. ५६ प्रकारच्या सात्विक पदार्थांचा नैवेद्य अर्पण केला जाईल. दुपारी ३ वाजता ही रथयात्रा नंदनवन लॉन्समधून प्रस्थान करेल. आयुर्वेद कॉर्नर, नेप्ती नाका, दिल्लीगेट, सारडा कॉलेज, प्रेमदान चौक, प्रोफेसर कॉलनी चौक, कुष्ठधाम रोड, श्रमिकनगर, भिस्तबाग नाका, पाईपलाईन रोड, श्रीराम चौक, दसरेनगर अशा नगर शहरातील विस्तारीत उपनगरांमधून सायंकाळी ५ वाजता पांढरी पुलाजवळील मिरी येथे रथयात्रा पोहोचेल. सायंकाळी ५ ते ७ मिरी येथे रथातील पादुका दर्शन सोहळा आणि महाप्रसाद होईल. रात्री श्री क्षेत्र देवगड येथे रथयात्रा मुक्कामी पोहोचेल. देवगडला श्री दत्त देवस्थानमधील भाविकांचा अध्यात्मिक कार्यक्रम, मंगल आरती, दिव्य दर्शन सोहळा पार पडेल.

५ जुलैला सकाळी ११ वाजता श्री क्षेत्र देवगड येथून हभप भास्करगिरी महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत ही रथयात्रा छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करेल.

१९६८–६९ साली नगर शहर आणि मिरी येथे श्री सत्यसाई सेवा समितीची स्थापना झाली. मानव सेवा हीच ईश्वरी सेवा हे ब्रीद समोर ठेवून गेली ५८ वर्षे या समितीच्यावतीने अध्यात्मिक, वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक सेवा कार्य सातत्याने सुरू आहे. त्यात अध्यात्मिक प्रबोधन, भजन, बालविकास, आरोग्य शिबीरे, निराधारांना मदत, अन्नदान, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत कार्य हे सर्व श्रीसत्यसाईबाबांचे दिव्य संदेश आणि शिकवणुकीप्रमाणे साईभक्त सेवाभावी वृत्तीने करत आहेत. प्रत्येकालाच श्रद्धेच्या ठिकाणी जाऊन श्रीगुरूचरणी नतमस्तक होणे शक्य नसते. रथयात्रेमुळे श्री स्वामी स्वतः आपल्या घरी येत आहेत, ही भाविकांची श्रद्धा असल्याने रथयात्रेची जय्यत तयारी करण्यात आली आहे.

रथयात्रेच्या यशस्वी संयोजनासाठी श्री सत्यसाई सेवा संघटनेचे जिल्हा प्रमुख अशोक कुरापाटी, अध्यात्मिक प्रमुख प्रा.ज्योती कुलकर्णी, अमोल सप्तर्षी, डॉ.शामसुंदर केकडे, ॲड रावसाहेब मिरीकर, नानासाहेब मिरीकर, स्वाती मिरीकर, नंदलाल व नलिनी भालेराव, नरसिंग व शोभा दुसा, अनिल व रेखा शर्मा, दिलीप मेहेर, ज्योती श्रोत्री, विलास नडिमेटला, विजय चावक, फुलचंद भळगट, शकुंतला पाटील, श्रीकृष्ण धर्माधिकारी, नितीन भंडारी, प्रा.काथार, रूक्मिणी संदुपटला, राजश्री राऊत, श्रृती केकडे आदि साईभक्त परिश्रम घेत आहेत.

आडसूळ कॉलेज ऑफ डी. फार्मसीचा १०० टक्के निकाल लागल्याने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

आडसूळ कॉलेज ऑफ डी. फार्मसीचा १०० टक्के निकाल

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित उन्हाळी परीक्षा–२०२६ मध्ये आडसूळ कॉलेज ऑफ फार्मसी, चास, अहिल्यानगर या महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष डी. फार्मसीचा १०० टक्के निकाल लागला असून प्रथम वर्ष डी. फार्मसीचा निकाल ८७.०४ टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या उत्कृष्ट शैक्षणिक परंपरेला साजेसे यश विद्यार्थ्यांनी प्राप्त केले आहे.

प्रथम वर्ष डी. फार्मसीमध्ये कु. वैशाली अर्जुन राऊत हिने ८०.१० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक प्राप्त केला. कु. कल्याणी भाऊसाहेब फलके हिने ७४.५० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर कु. सुजल बाजीराव किरदत हिने ७३.९० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक पटकाविला.

द्वितीय वर्ष डी. फार्मसीमध्ये कु. वैष्णवी भाऊसाहेब कांडेकर हिने ७३.४६ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. शशिकांत विलास खोडदे यांनी ७२.३६ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक, तर कु. अंजली कल्याण कदम हिने ७१.२७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या यशात मोलाची भर घातली आहे.

या यशाबद्दल साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि समाजोपयोगी कार्यामध्ये उल्लेखनीय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेच्या सचिव डॉ. लीना आडसूळ यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच संचालक कृष्णा आडसूळ, संचालक व प्राचार्य डॉ. प्रदीप एम. पाटील, संचालक व प्राचार्य डॉ. संभाजी पठारे, प्राचार्य डॉ. रमेश गडाख आणि प्राचार्य डॉ. प्रदीप पंडित यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी आडसूळ कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. धनंजय अशोक लांडगे यांनी महाविद्यालयाच्या निकालाची सविस्तर माहिती देत विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमांमुळे, पालकांच्या सहकार्यामुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाल्याचे त्यांनी सांगितले.

संगीतअष्टनायिका विशेष कार्यक्रमाला प्रतिसाद

बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने संगीतअष्टनायिका हा विशेष कार्यक्रम माऊली सभागृह सावेडी येथे नगरकर रसिकांच्या हाऊसफुल्ल प्रतिसादात रंगला

नगर – ज्येष्ठ आणि श्रेष्ठ गायिका अभिनेत्री पद्मश्री जयमालाबाई शिलेदार यांच्या जन्मशताब्दी निमित्त बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठान संस्थेच्या वतीने संगीतअष्टनायिका हा विशेष कार्यक्रम माऊली सभागृह सावेडी येथे २८ जून रोजी नगरकर रसिकांच्या हाऊसफुल्ल प्रतिसादात रंगला. या कार्यक्रमात जयमालाबाई शिलेदार यांनी मराठी संगीत रंगभूमीवर गाजवलेल्या विविध संगीत नाटकांमधील भूमिका लोकप्रिय नाट्यपदांसह सादर झाल्या. त्यात भक्ती गोखले पागे यांनी रेवती (संशयकल्लोळ) आणि शकुंतला(शाकुंतल), सावनी दातार कुलकर्णी यांनी देवयानी (विद्याहरण), सुभद्रा (सौभद्र), अस्मिता चिंचाळकर यांनी सत्यभामा (सुवर्णतुला), रुक्मिणी (स्वयंवर) आणि डॉ.धनश्री खरवंडीकर यांनी सिंधू (एकच प्याला), भमिनी(मानापमान) या भूमिका आणि त्यातील लोकप्रिय नाट्यपदे अतिशय अप्रतिम रंगवली. संगीत अष्टनायिका ही संकल्पना ज्येष्ठ गायिका अभिनेत्री आणि जयमालाबाईंच्या सुकन्या दीप्ती भोगले यांची आहे. या कार्यक्रमाची निर्मिती मराठी रंगभूमी, पुणे या संस्थेने केली आहे. वद जाऊ कुणाला, मना तळमळसी, खरा तो प्रेमा, पारिजात फुलला, स्वकुल तारक सुता, मजवरी तयांचे प्रेम खरे अशी सुरुवातीपासून शेवटपर्यंत एकापेक्षा एक सरस नाट्यपदे रसिकांना मोहवून टाकत होती आणि रसिकही एक विलक्षण अनुभूती अनुभवत होते. पदांना वन्समोअरची भरभरून दाद देत होते. भर पावसात रसिकांनी तुडुंब भरलेल्या सभागृहात नाटयपदांच्या वर्षावात रसिक चिंब भिजत होते.

कार्यक्रमात ज्येष्ठ गायिका अभिनेत्री वर्षा जोगळेकर यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि ओघवत्या शैलीत निवेदन केले. अत्यंत समर्पक आणि रंगतदार तबला साथ शेखर दरवडे आणि सुंदर ऑर्गन साथ मकरंद खरवंडीकर यांनी दिली. नेपथ्य मराठी रंगभूमी, पुणे, नेपथ्य सहाय्य संतोष गायकवाड आणि सहकारी, रंगभूषा सयाजी शेंडकर, केशभूषा सविता भैरी, प्रकाश योजना अथर्व धर्माधिकारी, ध्वनी व्यवस्था रवी जाधव यांनी केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनघा पछाडे यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहल उपाध्ये यांनी केले. अनुजा कुलकर्णी यांनी आभार मानले. कार्यक्रमस्थळी अतिशय सुंदर रांगोळी तेजश्री देवचक्के यांनी साकारली. सदर कार्यक्रमाचे प्रयोग पुणे आणि मुंबई येथे झाले असून हा कार्यक्रम म्हणजे अहिल्यानगरकर संगीत नाट्य रसिकांसाठी एक पर्वणी ठरली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ओंकार देऊळगावकर, रिद्धी कुलकर्णी, समर्थ कोर्टिकर, वेदांत कुलकर्णी, सुमेधा देशपांडे, अविनाश कुलकर्णी, अविनाश बोपर्डीकर, संकेत शाह, ऋषिकेश कुलकर्णी, संतोष आणि मोहिनी खोल्लम यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी कुमुदिनी बोपर्डीकर, अशोक गांधी, लक्ष्मणराव डहाळे, हेमंत आणि सविता काळे, अशोक आणि माधुरी गुर्जर, प्रकाश कांकरिया, सुधा कांकरिया, डॉ.नीरज करंदीकर, श्रीकांत जोशी, सतीश आचार्य, चंद्रकांत आणि वर्षा पंडित इत्यादी उपस्थित होते.

नेप्ती सोसायटीच्या प्रगतीत राजेंद्र खुंटाळे यांचे योगदान

माजी सरपंच संजय जपकर यांचे प्रतिपादन; सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सन्मान करून कर्तृत्वाचा गौरव

नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव राजेंद्र खुंटाळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला.

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचिव राजेंद्र खुंटाळे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त नेप्ती ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून गौरव करण्यात आला. अनेक वर्षे प्रामाणिकपणे, पारदर्शकतेने व सभासदांच्या हिताला प्राधान्य देत केलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली. माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर आणि रामदास फुले यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन खुंटाळे यांचा सन्मान करण्यात आला. अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

सोसायटीची आर्थिक शिस्त, सभासदांचा विश्वास, कर्जवाटपातील पारदर्शकता आणि विकासाभिमुख निर्णय यामुळे नेप्ती सेवा सोसायटीला वेगळी ओळख मिळाली असून त्यामध्ये खुंटाळे यांचे योगदान मोलाचे आहे. सचिव म्हणून काम करताना राजेंद्र खुंटाळे यांनी केवळ कार्यालयीन जबाबदाऱ्या पार पाडल्या नाहीत, तर सभासदांचा विश्वास जपत सेवा सोसायटीला सक्षम आणि विश्वासार्ह संस्था म्हणून उभी करण्याचे मोठे कार्य केले. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा, शिस्त, संयम आणि पारदर्शकता या गुणांचे दर्शन नेहमीच घडले. त्यामुळेच सोसायटीच्या प्रत्येक निर्णयावर सभासदांनी विश्वास ठेवला. नेप्ती सेवा सोसायटीच्या प्रगतीत राजेंद्र खुटाळे यांचे मोठे योगदान आहे असे प्रतिपादन माजी सरपंच संजय जपकर यांनी केले. ते पुढे म्हणाले, आज खुंटाळे सेवानिवृत्त होत असले तरी त्यांनी निर्माण केलेली कार्यसंस्कृती आणि विकासाचा वारसा पुढील पिढीला प्रेरणा देणारा आहे. कोणतीही संस्था केवळ इमारतींमुळे मोठी होत नाही, तर त्यामागे निष्ठेने काम करणारी माणसे असतात. राजेंद्र खुंटाळे हे त्यापैकीच एक आहेत. त्यांच्या सेवेमुळे नेप्ती सेवा सोसायटीने प्रगतीची अनेक टप्पे गाठले असून त्यांचे योगदान ग्रामस्थ कधीही विसरणार नाहीत. त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देतो.

रामदास फुले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राजेंद्र खुंटाळे यांनी आपल्या सेवाकाळात सभासदांना आपलेपणाने मार्गदर्शन केले. त्यांनी प्रत्येक काम जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे पूर्ण केले. त्यांच्या कार्यामुळे सोसायटीची विश्वासार्हता अधिक वाढली. सेवानिवृत्तीनंतरही त्यांचा अनुभव समाजाच्या विकासासाठी उपयोगी पडेल, असा विश्वास व्यक्त करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र खुंटाळे यांनी ग्रामस्थ, सभासद, संचालक मंडळ आणि सहकाऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या सेवाकाळात सर्वांच्या विश्वासामुळेच जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडता आल्या, असे सांगत त्यांनी मिळालेला सन्मान हा आयुष्यभर जपून ठेवणारी अमूल्य आठवण असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमास जिल्हा बँकेचे शाखा व्यवस्थापक गजेंद्र क्षीरसागर, माजी सरपंच संजय जपकर, उपसरपंच एकनाथ जपकर, रामदास फुले, ग्रामसेवक प्रवीण पानसंबळ, माजी उपसरपंच बाबासाहेब होळकर, दादू चौगुले, बंडू जपकर, चेअरमन सुरेंद्र होळकर, व्हाईस चेअरमन सादिक पवार, संचालक जालिंदर शिंदे, उमर सय्यद, अंबादास जपकर, राजेंद्र जपकर, सुरेश कदम, राजाराम जपकर, भाऊसाहेब होळकर, अशोक जपकर, मुक्ता कांडेकर, विलास जपकर, मच्छिंद्र होळकर, भास्कर जपकर, शांताबाई जपकर, जमीर सय्यद, अमोल चौगुले, माजी सचिव अशोक होळकर, रामराव कांडेकर यांच्यासह ग्रामस्थ व सभासद उपस्थित होते.

अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत यश मिळविलेले राधिका भरतनाट्यमच्या विद्यार्थिनी.

राधिका भरतनाट्यम ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या नुकत्याच झालेल्या एप्रिल २०२६ परीक्षा अंतर्गत भरत नाट्यम या विषयासाठी कल्याण रोड आदर्शनगर येथील कविता भांबरे – घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीप्रमाणे १००% निकाल लागला.

पुढीलप्रमाणे प्रारंभिक– हृत्वीका देवघडे, निधी नटाळे, काव्या झगडे, स्वरा खीलारी, कार्तिकी नजन, धनश्री गुंजाळ, तृप्ती गायकवाड, पूर्वी आढाव, श्रेया केंदळे, तेजश्री तरटे, तनिष्का दातरंगे. प्रवेशिका प्रथम –मनस्वी कावरे, वैदश्री कावरे, शर्वरी खताळ, विश्वा काकडे, अनुष्का सुंबे, पूर्वी नाटाळे,सान्वी तिवारी, मृणाल डोईफोडे, सान्वी तायडे, दूर्वा मवाळ, रुजवी सोनवणे, सबुरी लांडगे, सायली कांबळे, मेघना मंडलिक.

प्रवेशिका पूर्ण – रीवा राऊत, कीर्ती अर्शनपैल्ली, रीतीशा कोरडे,आराध्या कवाष्टे, हिमानी बोरुडे, ओवी गायकवाड, गार्गी अनभुले. मध्यमा प्रथम –रेवती बनबेरू, संतानिका लोडे, प्रगती अग्रवाल, इशिका भागवत, वेदांगी बोराडे. मध्यमा पूर्ण –तनिष्का बुरा, प्राणदा फुलारी, वेदिका गावडे, ईश्वरी कवाष्टे, सिद्धी आडेप, प्रणाली रसाळ, रेणुका शिंदे, तनिष्का दळवी. विशारद प्रथम –शरन्या बकाल, मयुरी कर्णावट.

याकरिता पालक आणि विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले जात असून भिंगार येथील ओमकार संगीत विद्यालय येथील अविनाश देऊळगावकर याच्या केंद्रातून परीक्षा संपन्न झाल्या तसेच गायनासाठी आदेश चव्हाण आणि मृदंग उत्कर्ष दळवी यांचे सहकार्य लाभले.

अहिल्यानगरमध्ये ४ जुलै रोजी मुस्लिम वधुवर (रिश्ता) मेळावा



नगर – नगर शहरात ४ जुलै रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत एकदिवसीय मुस्लिम वधुवर रिश्ता मेळावा आयोजित करण्यात आला असल्याचे रहमत सुलतान मॅरेज ब्युरोचे आरिफ सय्यद यांनी सांगितले. हा मेळावा सर्व मुस्लिम बिरादरीतील नागरिकांसाठी खुला असून विवाहासाठी योग्य स्थळ शोधणाऱ्या कुटुंबांना एकाच ठिकाणी अनेक पर्याय उपलब्ध होणार आहेत.

या मेळाव्यात संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या विवाहयोग्य मुला–मुलींचे फोटो व बायोडाटा पाहण्याची सुविधा उपलब्ध असेल. डॉक्टर, इंजिनियर, सुशिक्षित तसेच कमी शिक्षित, अविवाहित, घटस्फोटित, विधवा–विधुर अशा सर्व प्रकारच्या रिश्त्यांची माहिती येथे पाहायला मिळणार आहे, असे युनूस तांबटकर यांनी सांगितले.

या वधू–वर परिचय मेळाव्यासाठी येणाऱ्या पालकांनी आपल्याकडील मुला–मुलींचे फोटो व बायोडाटा सोबत आणणे आवश्यक आहे. इच्छुकांना आपल्या पसंतीनुसार योग्य रिश्ता शोधण्याची संधी मिळणार असून त्यामुळे विवाह जुळविण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे.असे शफकत सय्यद यांनी सांगितले.

या मेळाव्यासाठी प्रवेश पूर्णतः मोफत आहे. मात्र ज्या व्यक्तीकडे फोटो बायोडाटा असेल त्यांनाच प्रवेश दिला जाणार आहे. मेळाव्यानंतर घरी बसून पुढील संपर्कासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे.

विवाह इच्छुक कुटुंबांनी याचा लाभ घ्यावा, अधिक माहितीसाठी ७५१७८ ६०७८६, व ९८५०६ ८७८६८ या नंबरवर संपर्क करावे असे आवाहन आबीद दुलेखान यांनी केले आहे.

राष्ट्रीय कृषी दिन

जगाचा पोशिंदा व भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या तमाम शेतकरी बांधवांना राष्ट्रीय कृषी दिनाच्या खूप खूप शुभेच्छा. भारतातील शेती ही पावसाच्या पाण्यावरील जुगार मानली जाते आणि आमचा हा शेतकरी हा जुगार कायम खेळत असतो. कधी महापूर तर कधी आवर्षण, कधी आसमानी तर कधी सुलतानी याचा सामना करत जगण्यासाठीचा संघर्ष आणि जगण्यासाठीची कसरत तो नेहमीच करत असतो. आज तो पेरतो म्हणून आपणा सर्वांना पोटभर खायला मिळते. मी नेहमी म्हणत असतो सीमेवर जवान जसा ऊन वारा पाऊस झेलत अहोरात्र उभा असतो म्हणून आपण सुरक्षित राहू शकतो शांत झोपू शकतो, तसाच माझा बळीराजा, शेतकरी बांधव हा ऊन वारा पावसामध्ये मातीत राबत असतो म्हणून आपण पोटाला पोटभर खाऊ शकतो. याची जाणीव आपल्याला सदैव असली पाहिजे. त्याने जर त्याच्या पोटापुरतंच पिकवलं तर...!

विचार करून पहा म्हणजे लक्षात येइल की पैसेवाले, उद्योजक, भांडवलदार, नोकरदार काय खाणार आहोत आपण? माती की नोटा...! पण तो अन्नदाता असं कधीच करत नाही व करणार नाही, कारण सर्वांच्या जीवाची, आनंदाची काळजी असते त्याला. यासाठीची मोठी किंमतही मोजतो तो अनेकदा स्वतःचा जीव देऊन. सर्वांना कळतय देशांमध्ये, महाराष्ट्रामध्ये वर्षाला पाच हजाराच्या आसपास शेतकरी आत्महत्या होतात. भारतासारख्या कृषीप्रधान देशाचं दुसरं दुर्दैव ते काय असाव?

राजाने मारले, पावसाने झोडपले तर न्याय कुणाकडे मागायचा ? आणि इथे तर कुंपण शेत खात आहे. तरी तो हार मानत नाही आपल्या शेतामध्ये, पिकामध्येच पांडुरंगाला पाहत असतो. दुसऱ्यांना सुखाचा घास भरवण्यामध्येच वारीचा आनंद मानत असतो, आणि म्हणूनच त्याच्या घामाचा दाम त्याला मिळवा. पिकाला योग्य भाव मिळावा. त्याचही जीवन सुजलाम–सुफलाम व्हायला हवे. त्याच्याही जीवनात चार सुखाचे क्षण यायला हवेत. तो सर्वांच्या जीवनात आनंद भरतो. आपण त्याच्या आनंदाचे कारण व्हायला हवे.

आजचा काळ त्याच्यासाठी खूप खडतर, कठीण आहे म्हणून तो जीवनाचा शेवट करायला मागे पुढे पाहत नाही. अशा परिस्थितीत त्या बळीराजाला धीर देण्याची आधार देण्याची गरज आहे. त्याच्या पाठीमागे फक्त सरकारनेच नव्हे व समाजानेही उभे राहण्याची गरज आहे. यासाठी प्रसंगी सरकारला बळीराजांच्या समस्याची व अडचणींची जाणीव करून देण्यासाठी धारेवर धरण्याची गरज आहे. आठवण करून देण्याची गरज आहे. करण हा जगाचा पोशिंदा सुखी राहिला आनंदी राहिला तरच हे निसर्गचक्र उत्तमरीत्या चालेल नाहीतर माझ्या बापाने नाही केला पेरा तर काय खाशील धतुरा हे अशी परिस्थिती लवकरच येईल व भविष्यकाळासाठी ही धोक्याची घंटा असेल. हेही हेही आपल्याला लक्षात घ्यायला हवं. असं मला वाटतं.

जय जवान! जय किसान!!

– प्रा. सीताराम काकडे

नगरमध्ये ३ ते ५ जुलै दरम्यान 'अमृत पेठ – थेट बाजारपेठ'

नगर – अमृत (महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था) अहिल्यानगर व प्रतिबिंब संस्था अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगरमध्ये ३, ४ व ५ जुलै रोजी शमी गणपती मंदिर हॉल, दिल्लीगेट, अहिल्यानगर येथे अमृत पेठ – थेट बाजारपेठ भरणार असल्याची माहिती संयोजकांनी दिली आहे.

प्रतिबिंब संस्था व स्थानिक उत्पादकांनी तयार केलेल्या दर्जेदार उत्पादनांच्या विक्रीला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेतर्फे 'अमृतपेठ–थेट बाजारपेठ' हा विशेष उपक्रम राबवला जातो. अहिल्यानगरमध्ये मार्च व मे महिन्यात भरलेल्या प्रदर्शनाला प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे आता पुन्हा एकदा या उपक्रमाचे आयोजन अहिल्यानगरमध्ये करण्यात आले आहे.

स्वदेशी आणि दर्जेदार उत्पादने हे अमृतपेठचे वैशिष्ट्य असून, ग्राहक आणि उत्पादक अशा दोघांसाठीही हा उपक्रम फायद्याचा ठरतो. अनेक स्टॉल बुक झाले असून काही मोजकेच स्टॉल शिल्लक असून आजच आपला स्टॉल बुक करण्यासाठी ९२८४९३०६७४/९११२२२८७६९ यावर संपर्क करा.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

कलिडोस्कोप

अयोध्येतही मिळवा मियाझाकी आंबा

अयोध्या सध्या एका अनोख्या शेती प्रयोगामुळे संपूर्ण देशात चर्चेचा विषय बनली आहे. अयोध्येतील एका शेतकऱ्याने आपल्या घराच्या मागच्या बागेत जगातील सर्वात महागड्या आंब्याची जात मानला जाणारा 'मियाझाकी आंबा' यशस्वीरित्या पिकवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. अयोध्येतील अशरफपूर टोनिया येथील शेतकरी ओम प्रकाश सिंह यांनी आपल्या बागेत या मौल्यवान जपानी आंब्याची लागवड केली आहे. सध्या त्यांच्या झाडावर केवळ ८ ते १० आंबे आले आहेत; परंतु आगामी दोन ते तीन वर्षांमध्ये याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

हा आंबा पिवळा-हिरवा नव्हे, तर पिकल्यावर गडद लाल आणि जांभळा होतो. 'मियाझाकी' आंबा सामान्य आंब्यांसारखा नसतो. या वाणातील प्रत्येक आंब्याचे वजन साधारणपणे २५० ग्रॅम असते. हा आंबा इतर जातींसारखा पिकल्यानंतर पिवळा किंवा हिरवा होत नाही, तर त्याचा रंग अतिशय आकर्षक गडद लाल आणि जांभळा होतो. हा मौल्यवान आंबा प्रामुख्याने जपानमध्ये पिकवला जातो; परंतु ओम प्रकाश सिंह यांच्या यशामुळे आता अयोध्येच्या मातीतही या राजेशाही आंब्याची शेती सुरू झाली आहे.

मियाझाकी आंब्याची किंमत गगनाला भिडणारी असते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आणि जपानमध्ये या आंब्याची किंमत २.७ लाख रुपये प्रति किलो एवढी आहे, तर भारतात हा आंबा साधारणपणे १.५ लाख ते २ लाख रुपये प्रति किलो दराने विकला जातो. मियाझाकी आंबा प्रीमियम चवीसाठी ओळखला जातो आणि तो दुर्मिळ मानला जातो.

'वर्क फ्रॉम हिलस्टेशन' अधिक किफायतशीर?

आजच्या धकाधकीच्या कॉर्पोरेट जीवनाला कंटाळून अनेक जण 'वर्क फ्रॉम होम'ऐवजी 'वर्क फ्रॉम हिल स्टेशन'चे स्वप्न पाहत असतात; मात्र डोंगराळ भागात राहण्याचा खर्च किती येईल, खिशाला परवडेल का, हा प्रश्न अनेकांना सतावत असतो. दिल्लीतील अजय शर्मा यांचा याबाबतचा अनुभव आश्चर्यचकित करू शकतो.

सध्या अजय मनालीच्या निसर्गरम्य वातावरणात राहून रिमोट वर्क करत आहेत. त्यांनी 'सोशल मीडिया'वर आपला मासिक खर्च जाहीर केला असून, तो पाहून अनेकांना मनालीत राहणे दिल्ली-नोएडापेक्षाही स्वस्त वाटू लागले आहे. अजय यांनी मनालीमध्ये एक १ बीएचके फ्लॅट भाड्याने घेतला आहे. विशेष म्हणजे, दरमहा १४ हजार रुपयांच्या भाड्यात वीज बिल आणि वाय-फायचाही समावेश आहे. 'रिमोट वर्क' करणाऱ्यांसाठी इंटरनेट ही अत्यावश्यक गरज असते आणि त्याचा स्वतंत्र खर्चही त्यांना करावा लागत नाही.

अजय यांच्या मते, मनालीतील थंड हवेमुळे भूक चांगली लागते; मात्र ते बाहेरचे पदार्थ खाण्यापेक्षा स्वतः स्वयंपाक करणे पसंत करतात. त्यामुळे त्यांच्या महिन्याच्या किराणा खर्चावर सुमारे ३,५०० रुपये खर्च होतात. अधूनमधून बाहेर जेवणासाठी ते सुमारे ५०० रुपये खर्च करतात. फिटनेसकडेही ते दुर्लक्ष करत नाहीत. स्थानिक जिमचे मासिक शुल्क १,५०० रुपये आहे. प्रवासासाठी कोणत्याही वाहनाचा किंवा रिक्षाचा वापर न करता ते बहुतांश ठिकाणी पायीच जातात. त्यामुळे वाहतूक खर्च वाचतो आणि आरोग्यही चांगले राहते. एकूण मासिक खर्चाचा विचार केला तर मनालीसारख्या डोंगराळ पर्यटनस्थळी शांत आणि निवांत जीवन जगण्यासाठी अजय यांचा खर्च दरमहा सुमारे १९,५०० ते २१,००० रुपयांच्या दरम्यान येतो. यामध्ये सर्वात मोठा खर्च घरभाड्याचा असून, उर्वरित खर्च तुलनेने मर्यादित आहे. त्यामुळे रिमोट वर्क करणाऱ्यांसाठी मनाली हा परवडणारा आणि आकर्षक पर्याय ठरू शकतो.

मनाप्रमाणे उड्डाण, कमाईही भरपूर

आजच्या काळात प्रत्येकाला मुक्त आणि ग्लॅमरस करिअर हवं असतं. अशा वेळी 'फ्रीलान्स एअर होस्टेस' हा तरुणींसाठी एक वेगळा पर्याय ठरू शकतो. विशेष म्हणजे यात नोकरीचं कोणतंही बंधन नसतं, उलट आपण इच्छेनुसार खासगी जेटमध्ये उड्डाण करू शकतो, तेही मोठ्या मानधनासह.

एक अहवालानुसार, 'फ्रीलान्स एअर होस्टेस' कोणत्याही एअरलाइन कंपनीमध्ये नोकरी करत नाहीत, तर त्या खासगी जेट किंवा चार्टर्ड फ्लाइटसाठी काम करतात. या एअर होस्टेसना श्रीमंत उद्योगपती, सेलिब्रिटी किंवा परदेशी पाहुण्यांच्या खास फ्लाइटमध्ये काही तासांसाठी किंवा काही दिवसांसाठी कामावर ठेवलं जातं. त्यांना प्रत्येक फ्लाइटसाठी कालावधीनुसार आणि अंतरानुसार पैसे मिळतात. अनेकदा ही रक्कम लाखो रुपयांपर्यंत जाते.

खासगी जेट आणि नातं

३६ वर्षीय निया मूर जगभरातील श्रीमंतांच्या खासगी जेटमध्ये प्रवास करतात. लॉस एंजेलिसची रहिवासी असलेल्या नियाने आतापर्यंत फ्रान्स, दक्षिण आफ्रिका, मालदीव, ब्राझील आणि मोरोक्को यासारख्या अनेक देशांना भेटी दिल्या आहे; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुलं त्यांच्या ग्लॅमरस करिअरला इतकी घाबरतात, की त्यांचं नातं टिकत नाही. यापूर्वी, निया एकाच वेळी शेफ आणि आया म्हणून काम करताना घरकामही करत होत्या. त्यावेळी त्या बंबल ॲपवर एका पायलटला डेट करत होत्या. त्याने त्यांना फ्लाइट अटेंडंट होण्याचा सल्ला दिला. मग नियाने ४,००० डॉलर्स (सुमारे ३ लाख रुपये) खर्च करून प्रशिक्षण घेतलं आणि २०१७ पासून खासगी जेटच्या जगात प्रवेश केला.

चार दिवसांचं प्रशिक्षण

फक्त चार दिवसांच्या प्रशिक्षणात, त्यांना पेयं कशी बनवायची, आलिशान जेवण कसं तयार करायचं आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रवाशांचे प्राण कसे वाचवायचे हे शिकवण्यात आलं. आज त्या एक 'फ्रीलान्स फ्लाइट अटेंडंट' आहेत आणि स्वत:ला वाटेल तेव्हाच विमानप्रवास करतात.

भेंडीचा भाव गेला गगनावरी!

भारतीय घरांमध्ये आठवड्यातून किमान दोनदा तरी ताटात असणारी, लहान मुलांची लाडकी आणि गृहिणींसाठी झटपट होणारी साथी-सुलभ भाजी म्हणजे भेंडी. भारतीय बाजारात भेंडी फार-फार तर ४० ते ५० रुपये किलोने मिळते; मात्र सध्या 'सोशल मीडिया'वर हीच भेंडी जोरदार चर्चेत आहे. कारण आपली हीच साधी भेंडी सातासमुद्रापार अमेरिकेत चक्क ७,२५० रुपये किलो दराने विकली जात असल्याचे समोर आले आहे. इन्स्टाग्राम इन्फ्लुएन्सर आशिष आहुजाने याबद्दलची एक पोस्ट शेअर केली आहे. यामुळे सर्वजण चकित झाले आहेत.

आपण बाजारात गेलो की भेंडी कोवळी आहे की नाही हे पाहण्यासाठी तिचे टोक म ोडून बघतो; पण अमेरिकेतील एका सुपरम ार्केटमध्ये भेंडी अगदी छान स्टाईलमध्ये दिली जाते. आशिष आहुजाने जेव्हा या सुपरमार्केटला भेट दिली, तेव्हा त्याला कच्ची भेंडी कुठे दिसलीच नाही. त्याऐवजी तिथे एका पाकिटांमध्ये बंद असलेली, मस्त मसाल्यात घोळवलेली आणि कुरकुरीत तळलेली भेंडी विकली जात होती.

आशिषने त्याची किंमत पाहिली तेव्हा त्याला झटकाच बसला. अवघ्या ८५ ग्रॅमच्या भेंडीच्या चिमुकल्या पाकिटाची किंमत ६.५ डॉलर्स इतकी होती. याचाच अर्थ आपल्या चलनात सुमारे ६०० रुपये. या हिशोबाने हिशोब केला, तर १ किलो कुरकुरीत भेंडीसाठी अमेरिकतील लोकांना तब्बल ७,२५० रुपये मोजावे लागत आहेत. इन्स्टाग्राम इन्फ्लुएन्सर आशिष आहुजा याने नुकताच 'सोशल मीडिया'वर एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओतून परदेशी बाजारपेठेत भारतीय भाज्यांचे कशा प्रकारे ब्रँडिंग केले जात आहे आणि त्यांची किंमत किती पटीने वाढवली जाते, याकडे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

दरम्यान, त्याच सुपरमार्केटमध्ये आंतरराष्ट्रीय ब्रँडचे लेज चिप्सचे पाकीट २.५० डॉलर्सला मिळत असताना, भेंडीचे पाकीट मात्र ६.५ डॉलर्सला विकले जात होते. या किमतीवर आशिष आहुजाने मिश्किल भाष्य केले. त्याने या वाढीव किमतीला भेंडीचा 'पर्सनॅलिटी टॅक्स' (व्यक्तिमत्व कर) असे म्हटले. भारतात स्वस्त मिळणारी ही भाजी अमेरिकेत इतकी महाग कशी झाली, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. याचे खरे उत्तर उत्तम पॅकेजिंग आणि स्मार्ट मार्केटिंगमध्ये दडलेले आहे. अमेरिकेत भेंडीला केवळ भाजी न मानता एक 'हेल्दी स्नॅक' म्हणून प्रमोट केले जात आहे. ही भेंडी खास पद्धतीने तळून आणि परदेशी ग्राहकांच्या आवडीचे मसाले लावून तयार केली जाते. त्यामुळे ती दीर्घकाळ टिकते. आरोग्याबाबत जागरूक असलेल्या अमेरिकन ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी या उत्पादनाला 'प्रीमियम' दर्जा देण्यात आला आहे.

सासू-जावयांचे जमले प्रेम!

उत्तर प्रदेशमधील कानपूर जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. सासू आणि जावई एकमेकांच्या प्रेमात इतके आकंठ बुडाले, की त्या ी कुटुंबियांच्या भावनांचा कोणताही विचार न करता चक्क कोर्टात जाऊन लग्न केले. त्यानंतर त्यांनी 'सोशल मीडिया'वर १३ सेकंदांचा व्हिडीओ शेअर करून आपल्या लग्नाची घोषणा केली; पण कुटुंबियांचा दबाव वाढताच हे जोडपे पळून गेले. ही घटना सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. एखादी आई आपल्याच मुलीचा संसार कसे काय उद्ध्वस्त करू शकते, असा प्रश्न आता लोक 'सोशल मीडिया'वर उपस्थित करत आहेत

अकबरपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील या घटनेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले असून, सासू आणि जावयाच्या प्रेमप्रकरणाची चर्चा सर्वत्र होत आहे. वृत्तानुसार, त्या तरुणाला आपल्या सासूची इतकी ओढ लागली, की त्यांनी गुपचूप कोर्टात लग्न केले. लग्नाचा व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर आल्यावर लोकांना धक्काच बसला. हे नाते समाजापासून लपवून ठेवण्याऐवजी या जोडप्याने ते जाहीर केले. लग्नाची पोस्ट व्हायरल होताच कुटुंबीय आणि स्थानिक रहिवासी हादरून गेले.

जावयाने आपल्या सासूला घरातून नेल्याची आणि त्यानंतर त्यांच्या लग्नाची बातमी समोर आली. या दोघांचे बऱ्याच काळापासून प्रेमसंबंध होते आणि त्यांनी समाज व कुटुंबाची पर्वा न करता एकत्र राहण्याचा निर्णय घेतला. सासू आणि जावई घरातून बेपत्ता झाल्याचे समजताच त्या तरुणाची पत्नी आणि कुटुंबियांना धक्का बसला आहे.

गूढरम्य 'आईनहॅलो' बेट

जगभरात बरीच बेटं आहेत. काही बेटं खूपच रहस्यमयी असल्याचं म्हटलं जातं. त्यापैकी एक बेट स्कॉटलंडमध्येही आहे. 'आईनहॅलो' असं या बेटाचं नाव आहे. बदामाच्या आकाराचं हे बेट खूप सुंदर आहे. पण लोकांना वर्षातला फक्त एकच दिवस इथे येण्याची परवानगी मिळते. उर्वरित ३६४ दिवस कोणालाही या बेटावर येता येत नाही. या बेटाचा आकार खूपच लहान आहे. त्यामुळे हे बेट नकाशावरही पटकन सापडत नाही. या बेटाशी संबंधित काही आख्यायिकाही आहेत. इथे भूताप्रेतांचा वास असल्याचं काही पौराणिक कथांमध्ये नमूद करण्यात आलं आहे. काही आख्यायिकांनुसार इथल्या बेटांवर नकारात्मक शक्तींचा प्रभाव आहे. या नकारात्मक शक्ती हे बेट गायब करतात, असेही उल्लेख काही ठिकाणी आढळतात. या बेटावर जलपऱ्यांचं अस्तित्व असून या पऱ्या उन्हाळ्यात समुद्रातून बाहेर पडत असल्याचंही बोललं जातं. अर्थात बुद्धीजीवींचं याबाबत वेगळं मत आहे. एके काळी या बेटावर माणसं रहात होती. मात्र १८५१ मध्ये इथे प्लेगची साथ आली. यामुळे इथले लोक बेट सोडून निघून गेले. आता हे बेट वैराण झालं आहे. इथे पुरातन इमारतींचे अवशेषही मिळाले आहेत. आईनहॅलो हे बेट ओर्कने बेटापासून अवघ्या ५०० किलोमीटर अंतरावर आहे. या बेटावर लोकं रहातात. मात्र असं असूनही आईनहॅलो बेटापर्यंत पोहोचणं अजिबात सोपं नाही.

जगबुडीच्या भीतीने

२०१२ मध्ये जगबुडी होणार असल्याचं भविष्य वर्तवण्यात आलं होतं. अनेकांना हे भविष्य खरं वाटलं. जगबुडी होऊ नये यासाठी उपाययोजना करणाऱ्यांची कमतरता नव्हती. त्या काळात लोक खूप घाबरले होते. पण प्रत्यक्षात असं काहीच घडलं नाही. आता २०२५ हे वर्ष सुरू आहे. मात्र जगबुडी केव्हाही होऊ शकते, असं अनेकांना वाटतं. जगबुडीसाठी आपण तयार असायला हवं, असा समज असणाऱ्या अवलियांची कमतरता नाही. ही मंडळी जगबुडीला अजूनही घाबरतात. असंच एक कुटुंब जगबुडी होण्याच्या भीतीमुळे तळघरात लपून बसलं. जवळपास नऊ वर्षं हे कुटुंब तळघरातच होतं. नेदरलँडमधल्या ड्रेंथ प्रांतातल्या रुइनरवल्ड गावातल्या एका फार्महाउसच्या तळघरात हे कुटुंब लपून बसलं होतं. यात ५८ वर्षांच्या ज्येष्ठासह १६ ते २५ या वयोगटातली ६ मुलं होती. त्यातलाच २५ वर्षांचा एक मुलगा तळघरातून पळून जाण्यात यशस्वी ठरला. त्यानंतर ही बाब उघडकीस आली. आता या ज्येष्ठ व्यक्तीची विचारपूस सुरू आहे. त्यातून काही खुलासे होण्याची अपेक्षा आहे.

मासा करतो मगरीची शिकार

समुद्र आणि नद्यांचं जग अनेक रहस्यं आणि आश्चर्यांनी भरलेलं आहे. काही जलचर प्राण्यांच्या क्षमता आणि शिकारीच्या पद्धती आपल्याला थक्क करून टाकतात. मगर हा पाण्यातला एक अत्यंत धोकादायक शिकारी आहे; पण आपल्या शिकारीसाठी किंवा स्वतःच्या बचावासाठी जोरदार इलेक्ट्रीक शॉक देऊन एका मोठ्या मगरीलाही जागीच ठार करू शकतो, असा एक मासा अस्तित्वात आहे.

या अद्भुत आणि धोकादायक माश्याचं नाव आहे 'ईल' म्हणजेच इलेक्ट्रिक ईल. हा मासा प्रामुख्याने दक्षिण अमेरिकेतील ॲमेझॉन आणि ओरिनोको नद्यांच्या खोऱ्यात आढळतो. तो दिसायला एखाद्या सापासारखा लांब असून त्याच्या शरीरात वीज निर्माण करण्याची एक अनोखी क्षमता असते.

किती शक्तिशाली असतो हा शॉक?

एक पूर्ण वाढ झालेला इलेक्ट्रिक ईल मासा धोका जाणवल्यास किंवा शिकार करताना, तब्बल ८६० व्होल्टपर्यंतचा विजेचा शॉक देऊ शकतो. हा शॉक इतका तीव्र असतो, की त्यामुळे लहान प्राणी किंवा मासे तर लगेच मरतातच; पण तो एका मोठ्या मगरीलाही काही क्षणांत निपचित पाडू शकतो. माणसाला एवढा मोठा शॉक बसला, तर तो गंभीर जखमी होऊ शकतो किंवा बेशुद्धही पडू शकतो. म्हणूनच, इलेक्ट्रिक ईल मासे असण्याची शक्यता असते, तिथे पाण्यात उतरताना किंवा मासेमारी करताना खूप काळजी घ्यावी लागते.

मासा वीज कशी निर्माण करतो ?

इलेक्ट्रिक ईलच्या शरीरात हजारो खास प्रकारच्या पेशी असतात. त्यांना 'इलेक्ट्रोसाईट्स' असं म्हणतात. या पेशी एखाद्या लहान बॅटरीप्रमाणे काम करतात. माशाला शॉक द्यायचा असतो, तेव्हा या हजारो पेशी एकाच वेळी, एका विशिष्ट क्रमाने एकत्र काम करतात आणि एक मोठा विजेचा प्रवाह निर्माण करतात. हा मासा विजेचा वापर शिकार करण्यासाठी, स्वतःचा बचाव करण्यासाठी आणि अंधारात किंवा गढूळ पाण्यात आपल्या आजूबाजूचा परिसर ओळखण्यासाठीही करतो.

ऊर्जास्रोत विकासाचा प्रयत्न

इलेक्ट्रिक ईल धोकादायक असला, तरी निसर्गाच्या या अद्भुत निर्मितीचा अभ्यास करून शास्त्रज्ञ अनेक नवीन गोष्टी शिकत आहेत. त्याच्या वीज निर्माण करण्याच्या पद्धतीवरून प्रेरणा घेऊन नवीन प्रकारच्या बॅटरीज किंवा ऊर्जा स्रोत विकसित करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पारनेर विधानसभा मतदारसंघातील यादीचे विशेष सखोल पुनरिक्षण सुरू

नगर – भारत निवडणूक आयोगाने १ ऑक्टोबर हा अर्हता दिनांक निश्चित करून पारनेर विधानसभा मतदारसंघातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची घोषणा केली आहे. या अंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ३० जून ते २९ जुलै या कालावधीत घरोघरी भेटी देऊन परिगणन अर्जांचे वाटप व संकलन करणार आहेत. या कार्यक्रमात नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी केले.

पारनेर विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ५८ हजार १६६ मतदार आहेत. त्यापैकी ३ लाख ८ हजार ५८५ मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले असून ४९ हजार ६६७ मतदारांचे मॅपिंग अद्याप बाकी आहे. तसेच ३५ हजार २६२ मतदारांच्या माहितीत त्रुटी आढळल्या आहेत. या पार्श्वभूमीवर विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या प्रक्रियेसाठी ४ सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी, ४२ अतिरिक्त मतदार नोंदणी अधिकारी, ३८ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक व ३६६ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व अधिकाऱ्यांनी पूर्वतयारीचा भाग म्हणून मॅपिंगचे काम पूर्ण केले असून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षणही देण्यात आले आहे.

मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या परिगणन अर्जांच्या आधारे ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येतील. याच कालावधीत मॅपिंग न झालेल्या अथवा चुकीचे मॅपिंग झालेल्या, मात्र अर्ज प्राप्त झालेल्या मतदारांच्या सुनावण्या घेऊन पडताळणी करण्यात येईल.

५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत सुनावणीदरम्यान सादर झालेल्या कागदपत्रांची पडताळणी करून संबंधित मतदारांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणे अथवा वगळणे याबाबत नियमांनुसार निर्णय घेण्यात येईल. दावे व हरकती निकाली काढल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान मतदारांच्या मदतीसाठी चोवीस तास कार्यरत असलेला मतदार मदत कक्ष क्रमांक १९५० उपलब्ध राहणार आहे. तसेच सर्व राजकीय पक्षांनी मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी नियुक्त करून विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमात मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना सहकार्य करावे, असे प्रशासनाने आवाहन केले आहे. या प्रतिनिधींना मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या स्तरावर विशेष प्रशिक्षणही देण्यात येणार आहे.

मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षणासाठी घरोघरी भेटी सुरू; नागरिकांनी सहकार्य करावे

उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांचे आवाहन

नगर – भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत ३० जून ते २९ जुलै या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी भेट देऊन गणना प्रपत्र वितरित करून ते भरून घेणार आहेत. नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन या प्रक्रियेस सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत केले.

यावेळी नायब तहसीलदार सुधीर उबाळे, नायब तहसीलदार कैलास साळुंखे आदी उपस्थित होते.

श्री.पाटील म्हणाले की, २२५ अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख १५ हजार २६४ मतदार असून २ लाख २४ हजार ४५२ मतदारांचे मॅपिंग पूर्ण करण्यात आले आहे. मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरीक्षणासाठी एकूण २९७ बीएलओ कार्यरत असून ३० पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी ४ सहायक मतदार नोंदणी अधिकारी आणि ३६ नव्याने सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. बीएलओंना मदतनीस म्हणून आशा सेविका व अंगणवाडी सेविकांचीही नियुक्ती करण्यात आली असून सर्व बीएलओंना २५ जून रोजी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुरळीत होण्यासाठी विविध राजकीय पक्षांच्या ६३१ मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी (बीएलए) यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे प्रशिक्षण ३० जून रोजी घेण्यात आले. बीएलओ घरी भेट देण्यासाठी आल्यानंतर नागरिकांनी आवश्यक कागदपत्रे व माहिती उपलब्ध करून देत सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमासाठी १ ऑक्टोबर २०२६ ही पात्रता तारीख निश्चित करण्यात आली आहे. २० ते २९ जून या कालावधीत आवश्यक साहित्याची तयारी, प्रशिक्षण व मुद्रण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून ३० जून ते २९ जुलै या कालावधीत बीएलओ घराघरांत जाऊन गणना प्रपत्राद्वारे माहिती संकलित करणार आहेत.

५ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा प्रारूप (मसुदा) प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारल्या जातील. प्राप्त दावे व हरकतींची छाननी व निकाली काढण्याची प्रक्रिया ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबर या कालावधीत पार पडेल. ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रकाशित करण्यात येणार असल्याची माहितीही श्री.पाटील यांनी यावेळी दिली.

आचार्यश्री प्रवीणऋषीजी महाराजांचे दिल्लीगेट परिसरात जल्लोषात स्वागत करण्यात आले.

आचार्यश्री प्रवीणऋषीजी महाराजांचे दिल्लीगेट परिसरात जल्लोषात स्वागत

'समर्पण चातुर्मास २०२६' चा प्रारंभ

नगर – आचार्यसम्राट श्री आनंदऋषीजी महाराज यांचे शिष्य, उपाध्याय प्रवर 'अर्हम् विज्ञा प्रणेता' श्री प्रवीणऋषीजी महाराज यांच्या धर्मयात्रेचे दिल्लीगेट परिसरात उत्साहात स्वागत करण्यात आले. ७ जुलै रोजी सकाळी ७:३० वाजता दिल्लीगेट येथील शुभम अनिल गांधी यांच्या निवासस्थानी गुरुदेवांचे मंगल आगमन झाले. याप्रसंगी गुरुदेवांच्या धार्मिक प्रवचनाची सुरुवात सौ. पायल गांधी यांनी भक्तीभावाने गायलेल्या स्वागतगीताने झाली, तर तीर्थेशऋषीजी महाराज यांच्या सुमधुर गायनाने उपस्थित भाविकांना मंत्रमुग्ध केले. या सोहळ्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपाध्यायश्रींनी समर्पण या शब्दाचा सखोल अर्थ सर्वांना अत्यंत सोप्या भाषेत समजून सांगितला. आषाढी पौर्णिमा म्हणजेच 'गुरुपौर्णिमा' ही केवळ एक तिथी नसून ती खऱ्या अर्थाने परिवर्तनाची तिथी आहे, असे उद्गार त्यांनी यावेळी काढले.

दिल्लीगेट परिसरामध्ये गुरुवाणी ऐकण्यासाठी अबालवृद्धांसह जनसमुदाय उपस्थित होता. हा अथांग जनसागर आणि भक्तांची अथांग श्रद्धा पाहून महाराजांचे मनही गहिवरून आले. गांधी परिवार आणि परिसरातील नागरिकांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे गुरुभक्तांना व्याख्यानाचा आणि दर्शनाचा लाभ शिस्तीत घेता आला. यंदाचा हा चातुर्मास 'समर्पण चातुर्मास' म्हणून साजरा होत असून, तो आध्यात्मिकदृष्ट्या अत्यंत उच्चकोटीचा ठरेल, अशी ग्वाही देण्यात आली. यामुळे परिसर भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.

'इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारणीसाठी 'अमृत'मार्फत प्रशिक्षणासह आर्थिक सहाय्य

नगर – हरित ऊर्जा, स्वच्छ पर्यावरण आणि शाश्वत विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभर 'ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी प्रोत्साहन उपक्रम' राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, महिला उद्योजक, स्वयंसहायता गट, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रातील उद्योजक, शेतकरी उत्पादक गट तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला तसेच आर्थिक सहाय्य मिळविण्यासाठी मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.

देशात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर झपाट्याने वाढत असल्याने आगामी काळात ईव्ही चार्जिंग स्टेशनचे व्यापक जाळे उभारण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. पेट्रोल पंपांप्रमाणे विविध ठिकाणी ईव्ही चार्जिंग स्टेशनची उपलब्धता वाढविणे ही काळाची गरज आहे. या क्षेत्रात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होत असून, त्यांचा लाभ युवक, महिला आणि इच्छुक उद्योजकांनी घ्यावा, या उद्देशाने अमृतने हा विशेष उपक्रम हाती घेतला आहे.

या उपक्रमांतर्गत ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन आणि व्यवस्थापन याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, हरित ऊर्जा सेवा, चार्जिंग नेटवर्कचे संचालन, ईव्ही उपकरणांची विक्री व सेवा, तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल तसेच ग्रामीण भागात चार्जिंग हब उभारणी आदी क्षेत्रांमध्ये उद्योगाच्या विविध संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचे विश्लेषण तसेच व्यवसाय व्यवस्थापन कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. भारतीय कंपन्या आणि तज्ज्ञांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येणार असून, पात्र लाभार्थ्यांना अमृतच्या 'वैयक्तिक कर्जावरील व्याज परतावा योजने'चा लाभ मिळू शकतो. त्यामुळे नवोदित उद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे.

युवक-युवती, महिला उद्योजक, स्वयंसहायता गट, एमएसएमई उद्योजक, शेतकरी उत्पादक गट, ग्रामीण उद्योजक तसेच स्वतःचा उद्योग सुरू करू इच्छिणारे नागरिक या उपक्रमासाठी पात्र राहतील. इच्छुकांनी अमृतच्या अधिकृत संकेतस्थळ www.mahaamrut.org.in येथे भेट देऊन 'योजना' विभागातील 'EV Charging Station Partner' या पर्यायावर क्लिक करून ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी संबंधित जिल्ह्यातील अमृत कार्यालयाशी संपर्क साधावा किंवा ९११२२२८७६९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अमृतच्या या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होईल. तसेच हरित ऊर्जेचा वापर वाढून युवक, महिला आणि ग्रामीण उद्योजकांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

१४.६६ कोटीच्या फसवणूक प्रकरणात माजी नगरसेवकासह दोघांना अटक

आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई, जमीन व्यवहारात डॉक्टरची केली होती फसवणूक

नगर – जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात सावेडी येथील डॉक्टरची तब्बल १४ कोटी ६६ लाख रूपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील संशयित आरोपी माजी नगरसेवक स्वप्नील रोहीदास शिंदे व महेश नारायण कुर्हे यांना आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना ३० जून रोजी न्यायालयासमोर हजर केले असता सहा दिवसांची (६ जुलैपर्यंत) पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

दरम्यान, १५ दिवसांपूर्वीच या गुन्ह्यातील मुख्य संशयित अमोल बबन जाधव (वय ४०, रा. मोरगव्हाण, ता. नेवासा) याला अटक केली होती. आतापर्यंत तिघांना या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. स्वप्नील शिंदे व महेश कुर्हे हे दोघे खून, मोक्का कलमान्वये दाखल गुन्ह्यात अटकेत होते. त्यांना नाशिक कारागृहातून वर्ग करून फसवणूकीच्या गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

डॉ. अनिल सुर्यभान आठरे (वय ७३, रा. झोपडी कॅन्टींग, सावेडी) असे फसवणूक झालेल्या डॉक्टरचे नाव आहे. त्यांनी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून ३० जणांच्या टोळीविरोधात कटकारस्थान रचून फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा तपासकामी आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील मुख्य संशयित अमोल जाधव हा गुन्हा दाखल झाल्यापासून पसार होता. त्याला सुरूवातीला अटक करण्यात आली. यानंतर स्वप्नील शिंदे व महेश कुर्हे हे न्यायालयीन कोठडीत असल्याने त्यांना वर्ग करून घेण्यात आले. त्यांना मंगळवारी अटक करून न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना ६ जुलैपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. पोलीस निरीक्षक डॉ. शरद गोर्डे या गुन्ह्याचा तपास करीत आहेत.

संगनमताने कट रचून केली होती फसवणूक

मुख्य संशयित स्वप्नील शिंदे, अमोल जाधव आणि त्यांच्या इतर साथीदारांनी संगनमत करून कट रचला. संशयित आरोपींनी डॉ. आठरे यांच्या जमीन खरेदी-विक्रीच्या वेगवेगळ्या व्यवहारांमध्ये सुरूवातीला त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर बनावट कागदपत्रे, बनावट मिळकती दाखवल्या. इतकेच नाही, तर बनावट मालक उभे करून, त्यांच्या बनावट सह्या करून डॉ. आठरे यांना दस्त हस्तांतरित केले. या खोट्या कागदपत्रांच्या आधारे आरोपींनी डॉ. आठरे यांच्याकडून वेळोवेळी पैसे उकळले. त्यांची एकूण १४ कोटी ६६ लाख ५१हजार रूपयांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे.

केडगाव, प्रभाग क्रमांक १७ मधील मोहिनीनगर जलकुंभ ते इंदिरानगर जलकुंभ नवीन जलवाहिनी कामाचे उद्घाटन

केडगाव प्रभाग क्रमांक १७ मध्ये माजी स्थायी समिती सभापती मनोज कोतकर यांच्या प्रयत्नातून मोहिनीनगर जलकुंभ ते इंदिरानगर जलकुंभ भरण्यासाठी नवीन जलवाहिनी कामाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, नगरसेवक मयूर बांगरे, जालिंदर कोतकर, सुमित लोंढे, अजित कोतकर, संभाजी पवार, अजय चितळे, सविता पवार, सुरेखा कदम, शकीला पठाण, विजया बोठे, अलका सुपेकर, सुरेखा खामकर, मीना भापकर, अनिता बेद्रे, सुनीता भापकर, सिताराम खामकर, संतोष कदम, शंकर भडांगे, भास्कर कराळे, रावसाहेब कातोरे, प्रकाश सुपेकर, निखिल काळे, यश भापकर, हर्षल कदम, सौरभ सुपेकर, प्रशांत लगड, नाना गायकवाड, प्रवीण वायकर, गणेश खामकर, सागर शिंदे, ओम कदम, प्रयम झरेकर, आदित्य पवार, हरिश्चंद्र शिर्के, शाहू गायकवाड आदींसह प्रभागातील नागरिक उपस्थित होते. (छाया – लहू दळवी)

निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीप्रकरणी 'कृषी गौरव फर्टिलायझर्स'वर कृषी विभागाची कारवाई

२१ लाख ८० हजार ४८६ रुपये किमतीचा २ हजार ३४ गोण्यांचा बेकायदेशीर खतसाठा जप्त ; परवाना निलंबित, मालकाविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – निकृष्ट दर्जाच्या खतांच्या विक्रीप्रकरणी मे. कृषी गौरव फर्टिलायझर्स, घोडेगाव ता.नेवासा या आस्थापनेवर कृषी विभागाने कारवाई करून २१ लाख ८० हजार ४८६ रुपयांचा २ हजार ३४ गोण्यांचा बेकायदेशीर खतसाठा जप्त केला आहे. तसेच, संबंधित आस्थापनेचा खत विक्री परवाना तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आला असून, मालक किरण चंद्रकांत दौंडकर यांच्याविरुद्ध सोनई पोलीस ठाण्यात विविध कायद्यांन्वये गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी सुधीर शिंदे यांनी दिली.

कृषी विभागाच्या पथकाने १५ जून २०२६ रोजी मे. कृषी गौरव फर्टिलायझर्स, प्लॉट क्र. बी-५६, एमआयडीसी, शिंगवे तुकाई येथील आस्थापनेची तपासणी केली असता खत विक्री व साठवणुकीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे तसेच नोंदवह्या उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. तपासणीदरम्यान विविध कंपन्यांच्या नावांचा वापर करून बेकायदेशीररीत्या उत्पादित करण्यात आलेल्या रासायनिक खतांच्या २ हजार ३४ गोण्या जप्त करण्यात आल्या.

जप्त केलेल्या खतांचे नमुने पुणे येथील खत नियंत्रण प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले. नियमानुसार तपासणी अहवालासाठी ३० दिवसांचा कालावधी उपलब्ध असतानाही प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन कृषी विभागाने अवघ्या १० दिवसांत प्रयोगशाळा तपासणी पूर्ण करून अहवाल प्राप्त केला. प्रयोगशाळेच्या अहवालानुसार संबंधित खतांचे नमुने पीएच, सेंद्रिय कर्ब आणि कार्बन-नायट्रोजन (सी/एन) गुणोत्तर या विहित मानकांनुसार अयोग्य आढळले असून, संबंधित खते निकृष्ट दर्जाची असल्याचे निष्पन्न झाले आहे.

निकृष्ट दर्जाची अथवा बेकायदेशीर खते विकणाऱ्यांविरुद्ध कृषी विभागाकडून यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असून, अशा प्रकरणांमध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले.

माहितीचा अधिकार कायद्यातील बदलाविरोधात अण्णा हजारे यांचे ५ जुलैपासून 'बेमुदत उपोषण'

नगर – माहितीचा अधिकार कायद्यात केलेले बदल राज्य सरकारने तातडीने मागे घ्यावेत, या प्रमुख मागणीसाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी ५ जुलैपासून बेमुदत उपोषण सुरू करण्याची घोषणा केली आहे. या उपोषणाच्या पार्श्वभूमीवर हजारे यांची पुण्यातील रुबी हॉल क्लिनीकमध्ये २ जुलै रोजी संपूर्ण वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे.

माहिती अधिकार कायद्यात राज्य सरकारने मोठ्या प्रमाणात बदल केले आहेत. या बदलांविरोधात अण्णा हजारे यांनी उपोषण करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. मात्र, राज्य सरकारकडून अद्यापही यावर कोणताही ठोस अथवा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नसल्याने अण्णा हजारे आपल्या उपोषणाच्या निर्णयावर ठाम आहेत. या पार्श्वभूमीवर अण्णांच्या वाढत्या वयाचा विचार करता राळेगणसिद्धी ग्रामस्थांमध्ये आणि कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या प्रकृतीबाबत कमालीची चिंता व्यक्त केली जात आहे. उपोषण सुरू करण्यापूर्वी अण्णांच्या सर्व आवश्यक वैद्यकीय तपासण्या करण्यात याव्यात, असा आग्रह ग्रामस्थांनी धरला होता. उपोषणादरम्यान अण्णांच्या प्रकृतीत होणाऱ्या संभाव्य बदलांचे डॉक्टरांना अचूक निरीक्षण करता यावे, तसेच उपोषण सुरू होण्यापूर्वीच्या आरोग्यस्थितीची संपूर्ण वैद्यकीय नोंद उपलब्ध असावी, या उद्देशाने या तपासण्या अत्यंत आवश्यक असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली होती. ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांच्या या आग्रहाचा मान राखत अण्णा हजारे यांनी वैद्यकीय तपासणीसाठी संमती दिली आहे. त्यानुसार, २ जुलै रोजी पुणे येथील रुबी हॉल क्लिनिकमध्ये अण्णांच्या सर्व आवश्यक आणि महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्या केल्या जाणार आहेत.

भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींना 'तिहार जेल'मध्ये टाकावे, अन्यथा आरटीओचे खाजगीकरण करा : पंतप्रधानांकडे मागणी

जिल्हा श्रमिक असंघटीत कष्टकरी कामगार संघटनेचे निवेदन

नगर – अहिल्यानगर प्रादेशिक परिवहन कार्यालयात अधिकारी, कर्मचारी आणि दलालांची साखळी सक्रिय असून, सामान्य वाहनधारकांची रोज लाखो रुपयांची आर्थिक लूट केली जात आहे. हा भ्रष्टाचार थांबवण्यासाठी लोकसभेत कडक कायदा मंजूर करण्यात यावा. तसेच या भ्रष्टाचाराची सीबीआय, ईडीमार्फत चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांना तिहार जेलमध्ये टाकावे, अन्यथा आरटीओचे खाजगीकरण करावे, अशी मागणी अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटीत कष्टकरी कामगार संघटनेने केली आहे. याबाबत संघटनेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निवेदन पाठविले आहे.

या निवेदनात म्हटले आहे, सध्या देशामध्ये वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र, अहिल्यानगर आरटीओ कार्यालयामध्ये जर एखादा सामान्य वाहनधारक स्वतःचे काम घेऊन गेला, तर अधिकारी कोणत्याही कारणाने त्याचे काम अडवून धरतात. जोपर्यंत नागरिक दलालामार्फत जात नाहीत, तोपर्यंत एकही काम केले जात नाही. आरटीओ ऑफिस म्हणजे जणू दलालांचा अड्डा बनला असून, दलाल आणि अधिकारी संगनमताने नागरिकांना लुटत आहेत. एखादे वाहन बाहेरगावी असले तरी केवळ मोबाईलवर फोटो पाठवून एजंटमार्फत प्रदूषण प्रमाणपत्र घरबसल्या उपलब्ध करून दिले जाते. विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बस, फोर व्हीलर, ऑटो रिक्षा चालक आणि मोठ्या वाहन परवानाधारकांची प्रचंड लूट होत आहे. अधिकाऱ्यांकडून प्रति वाहन तब्बल ५ हजार रुपये दलालांमार्फत वसूल केले जातात. तसेच माल वाहतूक करणाऱ्या ट्रक आणि टेम्पो चालकांकडूनही दलालांमार्फत नियमित हप्ता वसुली केली जाते, असा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

एकीकडे केंद्रीय सडक परिवहन मंत्री म्हणतात की परिवहन कार्यालये भ्रष्टाचारमुक्त झाली आहेत. परंतु, प्रत्यक्षात येथे अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या साखळी पद्धतीने नागरिकांची लूटमार सुरू आहे. जनतेने टॅक्सच्या रूपाने भरलेल्या पैशातून ज्यांचा पगार होतो, तेच अधिकारी जनतेला लुटत आहेत.

केंद्रीय तपास यंत्रणांमार्फत (सीबीआय आणि ईडी) येथील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेची सखोल चौकशी करण्यात यावी आणि दोषींना जेलचा रस्ता दाखवून नागरिकांची आर्थिक लूट थांबवावी, अशी मागणी अहमदनगर जिल्हा श्रमिक असंघटीत कष्टकरी कामगार संघटनेचे अध्यक्ष विलास कराळे पाटील तसेच जुनैद लतीफ बागवान यांनी केली आहे.

आनंदऋषीजी योगा सेंटर

आनंदयोगमधील योग साधकांचे अभिप्राय

मी, लता अनिल तांबे मी योगाला १ वर्षेपासून नियमित येत आहे. मला मायग्रेनचा त्रास आहे. पहिले मी खूप गोळ्या औषधे घेतले. योगाला आल्यापासून माझा त्रास कमी झाला आहे. मला योगाला येण्याआधी खूप पाय दुखत होते. मला योगा केल्यानंतर खूप फ्रेश वाटते. मी दिवसभर काम केले तरी मला कंटाळा येत नाही.

आमचे योगगुरु अनिल मेहेर आम्हाला योगा शिकवण्यासाठी खूप मेहनत घेतात. आमच्या आजाराविषयी जाणून घेऊन त्या पध्दतीने योगा घेतात. त्याचा फायदा आम्हाला सर्व योग टीमला होतो. आमच्या योगाटीममध्ये सर्व जण तरुण असल्याचीच जाणीव आम्हाला योगा केल्यामुळे होते. त्यामुळे आम्हाला योगा करणे खूप आवडते.

'योग ही एक जादू आहे.' निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली म्हणजे योग.

योगासने आणि प्राणायाममुळे शरीरातील रक्ताभिसरण सुधारते, स्नायू बळकट होतात आणि पचनक्रिया उत्तम राहते.

नियमित योगाभ्यासामुळे ताणतणाव आणि चिंता कमी होऊन मन एकाग्र होते. यामध्ये प्रामुख्याने यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधी या अष्टांग योगाचा समावेश होतो.

– सौ. लता तांबे,
बुरुडगाव रोड, भोसले आखाडा, अहिल्यानगर

पाहिजेत

एम जी रोड व सावेडी येथील रेडीमेड दुकानासाठी

लेडिज कॅशियर (फुल /पार्ट टाईम)

कामाची वेळ- एम जी रोड- सकाळी .९.४५. ते ५
सावेडी - दु. ४ ते सांय.९ पर्यंत
पुर्ण वेळ सकाळी १०.३० ते सांय. ९ पर्यंत
कॉम्प्युटरचे व Tally excel compulsory & MS Excel & MS Word चे ज्ञान आवश्यक

संपुर्ण माहितीसह Resume हा 9890414800 what's app वर पाठवा

मदुरा स्टोअर्स एम जी रोड, अ.नगर
प्रोफेसर चौक, गुलमोहररोड कॉर्नर
पटवर्धन स्मारक पुढे, सावेडी, अ.नगर
संपर्क 9890414800, 9028905790

पाहिजेत

• साबण एजन्सी साठी माल वाहतूक महिंद्रा पिक-अप साठी ड्रायव्हर श्रमिक काम करणारा पाहिजे (ड्रायव्हिंग लायसन्स आवश्यक)
• हेल्पर पाहिजे

श्री कृष्णा कुबेर ट्रेडिंग
9901077002

पाहिजेत

मेडिकल साठी पाहिजेत
• फार्मासिस्ट - ४
• मार्केटिंग - २
• टेली कॉलर - २
- संपर्क -
9822189876

घर विकणे आहे

सारसनगरमधील नवीन पुलाजवळ ३ रुमचे घर विकणे आहे.
7447389284

तातडीने फ्लॅट विकणे आहे

अहिल्यानगरमधील कायनेटिक चौक परिसरातील प्रियंका कॉलनी, लक्ष्मी कृपा हाऊसींग सोसायटी (गणेश मंदिराच्या मागे) येथील त्रिकाया अपार्टमेंटमध्ये ३ ऱ्या मजल्यावर 2BHK फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध आहे.
* वैशिष्ट्ये : ४ मजली इमारत, लिफ्टची सोय, उत्कृष्ट आणि दर्जेदार बांधकाम
* विशेष : शहराच्या इतर ठिकाणांच्या तुलनेत अगदी कमी किमतीत आणि तातडिने विकणे आहे
* ठिकाण : रेल्वे ट्रॅक शेजारी, कायनेटिक चौक, अहिल्यानगर
संपर्क : मो. 8329292811 / 8999335649

गाळा त्वरित विकणे

पाईपलाईनरोड, नामदेव चौकातील ३५० स्क्वेअर फूट
9850716666

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

अहमदनगर सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स होलसेल अॅण्ड रिटेल स्टोअर्स लि.
अहिल्यानगर (ग्राहक भांडार) जुना दाणे डबरा, अहमदनगर फोन -०२४१-२३४५८५३

अहमदनगर शहरातील वेगवेगळ्या विभागामध्ये गॅस सिलेंडर घरपोहोच करणेसाठी
गॅस वाहक पाहिजेत
गॅस कंपनीमध्ये किमान दोन वर्षे काम केल्याचा अनुभव असावा.
शैक्षणिक पात्रता- इयत्ता १० वी पास
स्वतःचे वाहन थ्री किंवा फोर व्हिलर टॅम्पो व ड्रायव्हींग लायसेन्स असल्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. गरजूंनी आपला अर्ज दिनांक १०/०७/२०२६ पर्यंत खालील पत्त्यावर करावा.
अहमदनगर सेंट्रल को-ऑप. कंझ्युमर्स होलसेल अॅण्ड रिटेल स्टोअर्स लि. अहमदनगर (ग्राहक भांडार)
अहिल्यानगर (ग्राहक भांडार) जुना दाणे डबरा, अहमदनगर फोन-०२४१-२३४५८५३

सुरेंद्र भंडारी, जनरल मॅनेजर | शैलेश मुनोत, व्हा. चेअरमन | विक्रम फिरोदिया, चेअरमन

पाहिजेत

एमआयडीसी येथे ऑफिस कामासाठी स्विफ्ट डिझायर गाडीसाठी निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे. नागापूर-बोल्हेगाव एमआयडीसी भागातील ड्रायव्हरला प्राधान्य.
पोकलॅण्ड ऑपरेटर पाहिजे : जागा २
9561931337
8668692674

डीटीपी ऑपरेटर पाहिजे

कोरल-ड्रॉ, पेजमेकर, फोटोशॉप, इनडिझाईनच्या कामाचा अनुभव असलेले कॉम्प्युटरसाठी डिटीपी ऑपरेटर पाहिजे
भेटा - वेळ सायं.५ ते ८
दैनिक नवा मराठा कार्यालय
कै. आचार्य गुंदेचा चौक, गंज बाजार, अ.नगर
9823115157

WALK-IN-INTERVIEW FOR THE POST OF BILLING CLERK

1. APPOINTMENT : BILLING CLERK-CAVALRY GASAGENCY-ACC&S
2. QUALIFICATIONS : MINIMUM XII PASS WITH KNOWLEDGE & EXPERIENCE IN COMPUTER OPERATIONS
3. JOB DISCRIPTION :
(a) TO GENERATE BILLS
(b) MANAGE INVOICING AND PAYMENT RECORDS
(c) MAINTAIN DAILY SALE REGISTERES AND LEDGERS
(d) OPERATION OF STORES
(e) COMMUNICATION SKILLS
(f) OPERATION OF COMPUTERS
4. SALARY : RS 10,000/- PER MONTH (FIXED) + 3% YEARLY INCREMENT
5. WORKING HOURS : MORNING 09:30AM TO 14:00PM-16:00PM TO 18:00PM FRIDAY HALF DAY SUNDAY CLOSED.
5. DATE & TIME OF INTERVIEW : EXACT DATE & TIME WILL BE INTIMATED TO ELIGIBLE CANDIDATES LATER ON
6. TO REPORT TO : CAVALRY GAS AGENCY-ACC&S, AHMENDGAR-02
7. LAST DATE FOR SUBMISSION OF APPLICATION : 15 JULY 2026
8. DOCUMENTS REQUIRED : (a) ADHAAR CARD (b) ADDRESS PROOF (c) AGE PROOF (d) QUALIFICATION CERT (e) EXPERIENCE CERT (IF ANY)

CAVALRY GAS AGENCY-ACC&S, AHMEDNAGAR
Contact :- 7721047137

HAPPY
Doctors Day
God Can Not be Everywhere
So he Sends
Doctors
Well-Wisher
PITRODA SALES
Gulmohar Road, Savedi, A. Nagar. Mo.- 9823704000
Timber wood & Molding House

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल महावीर मॉल
स्वस्त म्हणजे नक्की काय असतें..?
रेनकोट आणि छत्री महोत्सव
पावसाळा सुरू होण्यापूर्वी पावसाळ्याची तयारी करुया
झील आणि वर्षा रेनकोटवर सरसकट 20% डिस्काउंट
रेनकोट खरेदी करा आणि अधिकचा डिस्काउंट मिळवा..
सर्व फ्रेश स्टॉक, नवीन डिझाईन रेडी स्टॉकमध्ये उपलब्ध
* सर्व शालेय मुलांचे सॅक वाले रेनकोट मिळतील.
* लेडीज रेनकोट मिळतील.
अधिक माहितीसाठी भेट द्या.. **श्री महावीर कलेक्शन**
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

अहमदनगर मर्चंटस् को ऑप.बँक लि.,अ.नगरच्या चेअरमनपदी मा.श्री.संजयजी चोपडा यांची एकमताने निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन

मा.श्री.संजयजी चोपडा

: शुभेच्छूक :
श्री. नंदकुमार मेहेर
श्री. रविंद्र शेलोत
श्री. विजय गुगळे
श्री. संजय लुणिया
श्री. सुरेश भंडारी
श्री. राजेंद्र गांधी
श्री. राजकुमार लुणिया
श्री. जवाहर कटारिया
श्री. अशोक भंडारी
श्री. सचिन मुथा
आणि समस्त मित्र परिवार,अहिल्यानगर

Become a COMPUTER PROFESSIONAL
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
www.dishagroup.in
Enroll Now

PROGRAMMING
- SOFTWARE DEVELOPMENT
- DATA ANALYST & DATA SCIENCE
- FULL STACK DEVELOPMENT

DIPLOMA COURSES
- 2D & 3D ANIMATION
- ADVANCE ACCOUNTING
- CAD TRAINING PROGRAM

दिल्ली गेट शाखा 9371051769 | जुने बस स्टँड शाखा 9371151769 | पाईपलाईन शाखा 7447761769

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर ठरलेला असून त्यापोटी आमच्या अशिलाकडून विद्यमान मालकाने विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत विद्यमान मालकाच्या मालकीची व वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालू नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१० दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. ही नोटीस प्रसिद्धीस दिली. **ता. ०१/०७/२०२६**

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे नेऊर येथील जिरायत शेतजमिन** मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

गट नं. ४९२ चे क्षेत्र ३ हे. ४३ आर+पो. ख. ० हे. १८ आर असे एकुण क्षेत्र ३ हे. ६१ आर यावा आकार २ रु. ०० पै. यापैकी मालमालावे क्षेत्र ० हे. ८५.८५ आर+ पो. ख. ० हे. ०४.५० आर असे एकुण क्षेत्र ० हे. ९०.२५ आर ही संपुर्ण शेतजमिन मिळकत.

चतुःसीमा
पूर्वेस : गट नं. ४१२ पैकी कैलास पावलस पाटोळे यांचे क्षेत्र दक्षिणेसः रस्ता
पश्चिमेस : गट नं. ४१२ पैकी दादाबा विठोबा सोनवणे यांचे क्षेत्र
उत्तरेस : बेल्हेकर यांचे क्षेत्र

वर नमूद मिळकतीचे विद्यमान मालक-
बाबासाहेब दादा सोनवणे
रा. सर्व्हे नं.३२/२, सोनाई पार्क, खराडी रोड, ओल्ड साई मंदिर जवळ, चंदन नगर, पुणे-४११०१४.

ॲड.समीर वखारे
पत्ता- ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर, मो. नं. ९०११६७८९९९ , ९८६०८०५५९९

आपण आजारी नसतानाही
हात-पाय गळून जाणे.
अंग दुखणे, पाठ दुखणे.
कंबर दुखणे, थकवा येणे.
कामाचा उत्साह नसणे.
अशक्तपणा वाटणे.
सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
डॉ.सौ. उर्मिला गिते
या सर्व तक्रारींवर खात्रीशीर सामाजिक जाणिवेतून मोफत सल्ला व शिबिर
अक्षय मुलांचे हॉस्पिटल व प्रसुतिगृह
बालिकाश्रम रोड, अ.नगर.
9422740888

९ वे पुण्यस्मरण

स्व. प्रकाश एकनाथ बिज्जा
स्व. दि. ०१/०७/२०१७

पाऊले चालतात दाही दिशांना पण त्यात बळ तुमचेच...
आव्हानांचा करतो स्विकार पण आशिर्वाद तुमचेच...
विशाल जरी जग सारे पण त्यात मायेची सावली तुमचीच...
आपल्या पावन स्मृतिस भावपूर्ण श्रद्धांजली..
॥ दुःखांकित ॥
श्रीमती प्रभावती प्रकाश बिज्जा
वैभव प्रकाश बिज्जा । यश वैभव बिज्जा
समस्त बिज्जा परिवार, अ.नगर

२३ वे पुण्यस्मरण

स्व. पै. भानुदास पांडुरंग कावळे
(मा.नगरसेवक) स्व. दि. २/७/२००३

आपली नम्रता, सेवा, प्रेमळपणा, दानशुरता व शिस्तप्रिय जीवन सदैव आठवणीत राहील...
आपल्या पावन स्मृतिस भावपुर्ण श्रद्धांजली...
- दुःखांकित -
समस्त कावळे परिवार, अ.नगर

९ वे पुण्यस्मरण

आपल्या संस्काररूपी स्मृतींचा..
स्मृतीगंध आजही दरवळत आहे..
प्रत्येक क्षणोक्षणी आपणच
आम्हांला प्रेरणा देत आहे..

कै.केशवराव भिकाजी चिपाडे
स्व.दि.१/७/२०१७
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
- दुःखांकित -
रविंद्र केशवराव चिपाडे (मुलगा)
धनंजय केशवराव चिपाडे (मुलगा)
गणेश केशवराव चिपाडे (मुलगा)
रजनी तान्हाजी रासकर (मुलगी)
समस्त चिपाडे परिवार
आगरकर मळा, स्टेशन रोड, अ.नगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक मे.ओम साई इंजिनिअर्सचे प्रोप्रायटर म्हणून, श्री. अण्णासाहेब दाजीबा शिंदे यांचे नावे एम.आय.डी.सी.कडुन लिज डिड तत्वाने मालकी हक्कांत आलेली आहे.सदरील मिळकत आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देवून ती आमचे अशिलास एम.आय.डी.सी. चे परवानगीने खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पुर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे. सबब ज्या कोणाचेही कसलाही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले दिवसांपासून १० दिवसांचे आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबत कागदोपत्री पुराव्यांनिशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटून त्याची खातरजमा करून घ्यावी व या व्यवहारांत लेखी हरकत घ्यावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पूर्ण करेल. व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही. यांची नोंद घ्यावी.

-परिशिष्ट मिळकतीचे वर्णन-

मौजे नागापूर ता. जि. अहिल्यानगर येथील अ. नगर महानगरपालिका हद्दीतील एम.आय.डी.सी.औद्योगिक वसाहतीतील औद्योगिक वापरातील कारणाकरीताचा प्लॉट-

प्लॉट नं.	एकुण क्षेत्रफळ
बी १२	५०००.०० चौ.मी.

हा संपूर्ण प्लॉट व त्यावरील औद्योगिक शेडचे संपूर्ण बांधकाम क्षेत्र १३०८.२० चौ. मी. यामध्ये कारखाना शेड, चौकीदार कक्ष व स्वच्छता गृह तसेच यामध्ये असणारे एम.आय.डी.सी. पाणी कनेक्शन व इले. मीटर कनेक्शनसह तसेच यातील तदंगभुत वस्तुसह मिळकत आमचे अशिलांस खरेदी देणेचे ठरले आहे.

चतुःसिमा
पुर्वेस- प्लॉट नं. बी. ११ दक्षिणेस- प्लॉट नं. बी. २
पश्चिमेस- प्लॉट नं. बी १३ उत्तरेस- रस्ता
येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वकची मिळकत. जाहीर नोटीस दिली.
ता. ०१.०७.२०२६

ॲड.निहालअहमद बाबुलाल बागवान
श्रेयस लॉनच्या मागे, सैनिक कॉर्नर, तपोवन रोड, भिस्तबाग, अहिल्यानगर
मो.नं.९९२१३५५७७८

ॲड.विजय प्रल्हाद अत्रे
"पुर्णश्री", प्लॉट नं. २८ स्वामी गजानन नगर, कजबे मळा, भिस्तबाग, अहिल्यानगर
मो.नं.९८२२०४३९६७.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक **गुलशन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, अहिल्यानगर चे सभासद या नात्याने श्री.सय्यद मोहंमद जहीर.स.१२८/३०,रजाक मंझील,फर्स्ट फ्लोअर,रूम नं.३७, डिग्टीमकर रोड, अहमद रोलर हायस्कूल,नागपाडा,मुंबई यांचे** मालकी व वहिवाटीत आहे.व त्याप्रमाणे त्यांचे नाव मिळकतीचे उताऱ्यावर धारक सदरी दाखल आहे, सदरील घर मिळकत ही आज रोजी निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा देऊन ती आमचे अशिलांस सोसायटीचे संमतीने खरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. आमचे अशिल हा खरेदी व्यवहार लवकरच पूर्ण करण्याचे विचारात आहेत. तत्पुर्वी या मिळकतीची विद्यमान मालकांची मालकी व मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबतची खातरजमा करून घेण्याच्या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिध्द केलेली आहे. सबब ज्या कोणाचीही कसलाही कायदेशीर अधिकार, हक्क, अथवा हितसंबंध या मिळकतीत असतील अशाने ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले दिवसांपासून **७ दिवसांचे** आत त्याचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाच्या कागदोपत्री पुराव्यानिशी खाली सही करणाऱ्यांकडे समक्ष भेटुन त्याची खातरजमा करून घ्यावी व या व्यवहारास लेखी हरकत घ्यावी.या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरून आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल व मग कोणाचीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट :- जिल्हा तुकडी अहिल्यानगर पो.तु. ता.व जि. अहिल्यानगर येथील मौजे भिंगार येथील अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील तसेच मे.दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील खालील तपशीलाची मिळकत :-

स.नं.	प्लॉट नं.	एकुण क्षेत्रफळ
३३८/४/३३९	४७	१.५०.०० आर/चौ.मी.(१५०.०० चौ.मी.).

यामध्ये लोड बेअरीगमधील बांधकाम झालेल्या गुलशन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, अहिल्यानगर मधील रो हाऊसींग स्किम मधील ब्लॉक नं.ए १ यावे प्लॉटचे क्षेत्रफळ ०.५०.०० आर/चौ.मी.(५०.०० चौ.मी.) व त्यावरील तळमजल्यावरील बांधकाम क्षेत्रफळ ४२.३५ चौ.मी.व पहिल्या मजल्यावरील बांधकाम क्षेत्रफळ ४२.३५ चौ.मी.असे एकुण दुमजली बांधकाम क्षेत्रफळ ८४.७० चौ.मी. यातील इले.मीटर,नळकनेक्शनसह आमचे अशिलांस खरेदी देण्याचे ठरले आहे.

चतुःसिमा :-
पुर्वेस :-९ मी.रस्ता. दक्षिणेस :- ब्लॉक नं.ए २.
पश्चिमेस :- ड्रेनेज लाईन व बोळ. उत्तरेस :- मोकळी जागा व ६ मी.रस्ता.
येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वकची मिळकत.नोटीस दिली ता.०१.०७.२०२६.

ॲड.निहालअहमद बाबुलाल बागवान
श्रेयस लॉनच्या मागे, सैनिक कॉर्नर, तपोवन रोड, भिस्तबाग, अहिल्यानगर
मो.नं.९९२१३५५७७८

ॲड.विजय प्रल्हाद अत्रे
"पुर्णश्री", प्लॉट नं. २८ गावडे मळा, भिस्तबाग अहिल्यानगर
मो.नं.९८२२०४३९६७.

जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडून विसाचापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीवर एच.डी.बी 'फायनान्शीयल सर्व्हिसेस लि, या फायनान्स कंपनीच्या कर्जा शिवाय इतर कोणत्याही बँकेचे, पतसंस्थेचे, वित्तीय संस्थेचे व खासगी अथवा इतर कुठल्याही प्रकारे कर्ज नाही. सदर मिळकतीबाबत कोर्टात कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे सदर मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. त्याचप्रमाणे सदर मिळकतीवर एच.डी.बी फायनान्शीयल सर्व्हिसेस लि, या फायनान्स कंपनीचे संपुर्ण कर्ज मिळकतीचे खरेदीखतापुर्वी भरून मिळकत निष्कर्जी करुन दिले जाईल अशी खात्री, हमी, विश्वास, भरोसा व वचन मिळकतीचे विद्यमान मालकाने आमच्या अशिलास दिले आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यानी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.
ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.०१/०७/२०२६.

परिशिष्ट मिळकतीचे वर्णन

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, मौजे शहर अहिल्यानगर येथील दाळ मंडई रस्त्यावरील जागेसह बांधकाम असलेली खालील वर्णनाची मिळकत -

सिटी सर्व्हे नंबर २०९७ यावा म्युनिसिपल घर नं.२४३०/७००४ चे एकुण जागेचे क्षेत्रफळ २०.९० चौ.मीटर ही संपुर्ण जागा व त्यावर असलेले एकुण संपुर्ण बांधकाम, लाईट मीटर व नळ कनेक्शनसह काहीएक राखुन न ठेविता संपुर्ण मिळकत.

चतुःसिमा
पुर्वेस :- सिटी सर्व्हे नं.१०९८ दक्षिणेस :- दाळ मंडई रस्ता
पश्चिमेस :- बोळ उत्तरेस :- सिटी सर्व्हे नं.१०९६
वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक -
१. जतीन नविनचंद्र मेहता,
२. मनीष नविनचंद्र मेहता
दोघे रा. दाळ मंडई, ता.जि. अहिल्यानगर.

ॲड.समीर वखारे
पत्ता- ऑफीस नं. ५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर, मो. नं. ९०११६७८९९९ , ९८६०८०५५९९